दैनिक
लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२६१ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, मंगळवार, ५ मार्च २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

'ते म्हणतात, मला कुटुंबच नाही, माझं कुटुंब तर...,' लालूप्रसाद यांना नरेंद्र मोदींनी दिले प्रत्युत्तर

नवी दिल्ली, प्रगती शर्मा:

राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख आणि इंडिया आघाडीतील प्रमुख नेते लालूप्रसाद यादव यांनी कुटुंबावरून पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जोरदार टीका केली होती. त्याला आता स्वतः मोदींनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. मोदी म्हणाले की, माज्या कुटुंबावरून मला लक्ष्य केले गेले. मात्र आता संपूर्ण देशच मी मोदींचं कुटुंब आहे, असं म्हणत आहे. परिवारवादी पक्षाचे चेहरे वेगवेगळे असले तरी त्यांचं चरित्र एकच असतं. दोन निश्चित गोष्टी आहेत. त्या म्हणजे यांच्या चरित्रामध्ये एक खोटेपणा आणि दुसरं लूट, असा टोलाही मोदींनी लगावला. तेलंगाणामध्ये सभेला संबोधित करताना, नरेंद्र मोदी म्हणाले की, १४० कोटी देशवासीय माझं कुटुंब आहेत. आज देशातील कोट्यवधी माता-भगिनी-मुली हेच मोदीचं कुटुंब आहे. जेशातील प्रत्येक गरीब हा माझं कुटुंब आहे. ज्यांचं कुणी नाही ते मोदींचे आहेत. मोदी त्यांचा आहे. माझा भारत माझं कुटुंब आहे. याच भावनेचा विस्तार घेऊन मी स्वप्नांना संकल्पासह सिद्धीस नेण्यासाठी तुमच्यासाठी जगत आहे. तुमच्यासाठी झगडत आहे आणि तुमच्यासाठीच लढत राहीन. काल पाटणामध्ये इंडिया आघाडीच्या सभेमध्ये लालू प्रसाद यादव यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर वैयक्तिक हल्ले केले होते. त्यांनी मोदींचं कुटुंब नसण्यावरून टीका केली होती. त्याला आज मोदींनी तेलंगाणामधून उत्तर दिलं आहे. भ्रष्टाचार. परिवारवाद आणि तुष्टीकरणामध्ये गुंतलेले इंडिया आघाडीचे नेते चिडचिड करत आहेत. त्यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीचा खरा जाहीरनामा समोर आणला आहे.

'लवकरात लवकर समविचारी पक्षांसोबत...' आव्हाडांची आंबेडकरांना भावनिक साद

ठाणे, यश सावंत :

महाविकास आघाडीसोबत अद्याप युती झाली नसल्याने त्यांच्या कोणत्याही कार्यक्रमात वंचितच्या कार्यकर्त्यांनी जाऊ नये असे आवाहन डॉ. प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे. तसेच अद्यापही महाविकास आघाडीसोबत जाण्याबाबत त्यांनी आपला निर्णय जाहीर केलेला नाही. त्यामुळे त्यांना महाविकास आघाडी सोबत घेण्यासाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी एका पत्राद्वारे त्यांना भावनिक आवाहन केले आहे. लवकरात लवकर समविचारी पक्षांसोबत एखादी बैठक घेऊन महाराष्ट्रात एक वेगळा संदेश दिला जाईल यासाठी आपण प्रयत्न करुया असे आव्हाड यांनी त्या पत्रात नमुद केले आहे.

महाविकास आघाडी सोबत जायचे किंवा नाही, याबाबत वंचितचे आजही तळ्यात मळ्यात वातावरण आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचे चित्रही अद्याप स्पष्ट होत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे आंबेडकरांना आपलेसे करण्यासाठी आव्हाड हे आता मैदानात उतरले असून त्यांनी आंबेडकरांना भावनिक साद घातली आहे. मी शिव, फुले, शाहू, आंबेडकर या महामानवांच्या विचारांचा प्रचार-प्रसार व्हावा आणि जनमाणसात पुरोगामी विचार धारे बाबत महाराष्ट्रात प्रेम, आपुलकी, माया निर्माण व्हावी, यासाठी मी कायम प्रयत्नशील असतो. मी जरी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार या पक्षाचा कार्यकर्ता असलो तरी माज्या काही वैयक्तीक भुमिका आहेत. महाराष्ट्राची पुरोगामी विचारधार जोपासणारे अनेक नेते आहेत. त्यातील महत्वाचे नते म्हणून म्हणजेच आपल्याकडे पाहिले जात आहे.

तुमच्याकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वारसा आहे. या वारसाचा पूर्ण सन्मान ठेवून मी त्यांना एकच विनंती करतो की तुमचे ध्येय आणि आमचे ध्येय एकच आहे. ते म्हणजे संविधान वाचविणे आणि देशातील लोकशाही कशी सुरक्षित राहिल, यासाठी प्रयत्न करणे, त्यासाठी वाटेल ती किमंत मोजायला मी तरी तयार आहे. आपणही याच विचारांचे आहात, संविधान आणि लोकशाही हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाला दिलेले अमुल्य धन आहे. जर या संविधानाला हात लावला गेला तर पुढील पिढी आपणाला कधीच माफ करणार नाही. जर या संविधानाला हात लावला गेला तर पुढील पिढी आपणाला कधीच माफ करणार नाही. त्यामुळे लवकरात लवकर समविचारी पक्षांसोबत एखादी बैठक घेऊन महाराष्ट्रात एक वेगळा संदेश दिला जाईल यासाठी आपण प्रयत्न करुया असे आव्हाड यांनी त्या पत्रात नमुद केले आहे.

'व्होट के बदले नोट' हे आता चालणार नाही.!', सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून स्वागत

मुंबई, विशाल पाटील :

सर्वोच्च न्यायालयाने व्होट के बदले नोट हे आता चालणार नाही म्हणत २६ वर्षांपूवीर्चा निर्णय बदलला आहे. पाच न्यायमूर्तींच्या खंडपीठाने दिलेला निर्णय सात न्यायमूर्तींच्या खंडपीठाने आता बदलला आहे. आमदार किंवा खासदार यांनी सभागृहात भाषण करण्यासाठी किंवा मतदानासाठी पैसे घेतले तर त्यांच्यावर खटला चालणार आहे. याचाच अर्थ व्होट के बदले नोट प्रकरणात लोकप्रतिनिधींना कुठलंही कायदेशीर संरक्षण मिळणार नाही. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा निर्णय स्वागतार्ह आहे असं म्हटलं आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने पूवीर्चा निर्णय बदलला आहे. ज्या खंडपीठाने नवा निर्णय दिला त्यामध्ये सरन्यायाधीश डी. वाय चंद्रचूड, न्यायमूर्ती ए. एस बोपन्ना, न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश, न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा, न्यायमूर्ती जे. पी. पारदीवाला, न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांचा समावेश होता. या निकालावर आता राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. लोकप्रतिनिधी आहे म्हणजे भ्रष्टाचाराचं लायसन्स मिळत नाही असं त्यांनी म्हटलं आहे. तसंच निर्णयाचं स्वागत केलं आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचं आम्ही स्वागतच करतो. प्रकरण भ्रष्टाचाराचं असेल तर कुणाला त्यातून वाचवण्याचा, वाचण्याचा प्रश्नच येत नाही. कुणीही आमदार, खासदार आहे किंवा लोकप्रतिनिधी आहे म्हणजे त्या व्यक्तीला भ्रष्टाचाराचं लायसन्स तर देता येत नाही. त्यामुळे १९९८ मध्ये जो निर्णय सर्वोच्च निर्णय घेतला होता तो निर्णय सर्वोच्च न्यायालयाने बदलला आहे.

वाचनाने माणूस अधिक सुसंस्कृत आणि समृद्ध होतो- आमदार आशिष शेलार

मुंबई, विशेष प्रतिनिधी :

वाचनाने माणूस अधिक सुसंस्कृत आणि समृद्ध होतो. प्रत्येकाने नॅशनल लायब्ररी येथे दोन दिवसीय सुरू असलेल्या या ग्रंथ महोत्सवाला जरूर भेट द्यावी, असे आवाहन आमदार ॲड. आशिष शेलार यांनी केले. दोन दिवस सुरू असणाऱ्या या ग्रंथ महोत्सवात वाचन प्रेमी ग्रंथ प्रेमी आणि सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मुंबई उपनगरचे मुलुंड येथील जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय बनसोड यांनी कळवले आहे. वांद्रे पश्चिम येथे नॅशनल लायब्ररीत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, मुंबई उपनगरतर्फे आयोजित 'ग्रंथ महोत्सव २०२३' चे आयोजन करण्यात आले आहे. या ग्रंथोत्सवाचे उद्घाटन मुंबई उपनगरचे आमदार आशिष शेलार यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रसिद्ध गायक आणि संगीतकार अवधूत गुप्ते, मुंबई उपनगरचे जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रमोद महाडिक, कोकण विभागाच्या प्रभारी सहाय्यक ग्रंथालय संचालक मंजुषा साळवे, राज्य ग्रंथालयाचे प्रशांत पाटील, ॲड. दीपक पडवळकर, मुंबई उपनगरचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय बनसोड उपस्थित होते. काळाच्या ओघात वाचनाच्या पद्धती बदललेल्या आहेत. मात्र नवी पिढी आजही वाचनाशी जोडली गेली आहे, त्यामुळे या ग्रंथोत्सवाला आवर्जून भेट द्यावी जेणेकरुन आपल्या साहित्य संस्कृतीची माहिती मिळेल. ग्रंथ महोत्सवात विविध प्रकाशकांची पुस्तके देखील आहेत. कार्यक्रमापूर्वी मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रंथ दिंडीने महोत्सवाची सुरुवात झाली. शालेय विद्यार्थ्यांनी या ग्रंथदिंडीमध्ये सहभाग घेतला. यावेळी,. कोकण विभागाच्या प्रभारी सहाय्यक ग्रंथालय संचालक श्रीमती साळवे यांनी आभार मानले.

ईव्हीएमच्या गैरवापराने जिंकले तर असंतोष पसरेल, उद्धव ठाकरे यांचा भाजपवर निशाणा

मुंबई, विशाल कारंडे :

जनतेत असंतोष आहे. ईव्हीएमने हे जिंकू शकतात आणि हे जिंकत आहेतच. मात्र, आता हे जिंकणार नाहीत, असा गैरसमज पसरवत आहेत. जनता हा लोकशाहीतला सर्वांत मोठा घटक आहे. जनतेच्या मनाविरुद्ध तोडाफोडीचे राजकारण भाजप करत आहे. जनतेच्या मनाविरुद्ध ईव्हीएमचा गैरवापर करून जिंकले तर मोठा असंतोष पसरेल, असा इशारा शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिला. ठाकरे यांनी मातोश्री निवासस्थानी पत्रकार परिषदेत भाजपच्या लोकसभेच्या पहिल्या यादीवरून टीका केली. ते म्हणाले, उद्योगपती, शेतकरी, कामगार यांच्यात असंतोष आहे. आपण जनतेसोबत आहोत. क्रांती ही नेते करत नसून क्रांती जनता करते. जनतेच्या मनाविरुद्ध झाले तर जनता क्रांती करणारच, भाजपने चंदीगडमध्येही अशा प्रकारे जिंकण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर राज्यसभा निवडणुकीनंतर असाच प्रयत्न केला. मात्र, आता तोडा, फोडा, तुरुंगात टाका आणि राज्य करा हे जास्त काळ टिकणार नाही. राज्यातल्या तळागाळातील शेवटच्या माणसापर्यंत फक्त घोषणा पोहोचतात, प्रत्यक्षात काहीच नाही. दहा वर्षांत अनेक जुन्या योजनांची नावे बदलली आहेत, तसेच आता जुमलाचे नाव गॅरंटी झाले आहे, अशीही टीका त्यांनी केली. भाजपने १९५ जणांची यादी जाहीर केली. मात्र, नितीन गडकरींचे नाव पहिल्या यादीत नाही, तर बेहिशेबी मालमत्ता जमवणाऱ्या कृपाशंकर सिंह यांचे नाव पहिल्या यादीत आहे.

व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे कैदी साधणार नातेवाईकांशी संवाद, तळोजा कारागृहात 'ई किस्कॉय' सुविधा

पनवेल, दिगंबर जाधव :

तळोजा कारागृहातील कैद्यांना व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे आपल्या नातेवाईकांना ई मुलाखत देता येणार आहे. या हायटेक सुविधेचे नाव ह्यई किस्कॉय आणि ग्रुप फोन असून सोमवार दि.4 रोजी या यंत्रणेचे उदघाटन अपर पोलीस महासंचालक प्रभात कुमार यांच्या हस्ते पार पडले.यावेळी कारागृह व सुधारसेवा महानिरीक्षक अमिताभ गुप्ता हे देखील उपस्थित होते. कैद्यांना न्यायालयीन तारखा आणि पेरॉल सुविधेसह ग्रुप फोन सुविधा मिळणार आहे. तळोजा कारागृह हा स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रातील पहिला कारागृह आहे. 2008 साली सुरु झालेल्या या कारागृहात सध्याच्या घडीला जवळपास तीन हजार कैदी शिक्षा भोगत आहेत. यामध्ये बॉम्बस्फोट, दंगल, नक्षलवादी, देश विघातक घटना आदींसह अनेक मोठ मोठ्या गुन्ह्यात शिक्षा भोगणाऱ्या कैद्यांचा समावेश आहे. या बायोमेट्रिक टच स्क्रीन मशीनमुळे कैद्यांना कुटुंबातील सदस्यांच्या सेलफोन नंबरवर सणाच्या शुभेच्छा पाठवता येणार आहेत. दुसऱ्या सुविधेच नाव ग्रुप फोन सुविधा आहे. एलन ग्रुप या तामिळनाडू स्थित कंपनीने सर्वप्रथम देशात हि सुविधा उभारली आहे. यापूर्वी येरवडा मध्यवर्ती कारागृहात 40 कॉलिंग बूथ स्थापित केले आहेत. राज्याच्या गृह विभागाने तामिळनाडू स्थित कंपनीची मोफत कैदी कॉलिंग प्रणाली सुरू करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. त्यानुसार तळोजा कारागृहात या सुविधांचे उदघाटन करण्यात आले. यावेळी भायखळा कारागृहाचे उपमहानिरीक्षक योगेश देसाई, कारागृह अधिक्षक प्रमोद वाघ, उपअधीक्षक महादेव पवार, तुरुंग अधिकारी राहुल झुटाले आदी उपस्थित होते. कैद्यांना आठवड्यातील 3 वेळा फोन करता येणार आहेत.6 मिनिटांच्या या फोन दरम्यान नातेवाईक, वकील आदींना फोन करता येणार आहेत.एकुण 10 मशीन तळोजा कारागृहात बसविन्यात आल्या आहेत.

वाघोलीत भर रस्त्यावर स्कूल व्हॅनमध्ये विद्यार्थी असताना चालकावर कोयत्याने हल्ला

पुणे, अभिजित येरल्लू :

व्हॅन मालकासोबत न्यायालयात गेला. याचा राग मनात धरून स्कूल व्हॅन चालकावर दुचाकीवर आलेल्या दोघांनी कोयत्याच्या सहाय्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. यावेळी व्हॅन मध्ये आठ विद्यार्थी होते. व्हॅनच्या काचा फुटण्याव्यतिरिक्त सुदैवाने कोणाही जखमी झाले नाही. ही घटना सोमवारी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास वाघोली बकोरी फाट्यावर बीजेएस विद्यालयाजवळ घडली.

सचिन दिगंबर इंगोले (वय २७, रा. काळूबाई नगर, वाघोली) असे हल्याचा प्रयत्न झालेल्या व्हॅन चालकाचे नाव आहे. या प्रकरणी त्याने फिर्याद दिली असून हल्ला करणाऱ्या अल्पवयीन तरुणासह आकाश तोरंभे (रा. वाघोली) या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोहन कदम हा व्हॅन मालक आहे. त्याच्याकडे इंगोले हा चालक म्हणून काम करतो. कदम यांच्यावर दाखल असलेल्या गुन्ह्याची सहा फेब्रुवारी २०२४ रोजी न्यायालयात तारीख होती. इंगोले हा कदम याच्या सोबत न्यायालयात गेला होता. न्यायालयात का गेला याचा राग मनात धरून त्याने मित्राच्या सहाय्याने स्कूल मधून व्हॅन निघाल्यानंतर चालकावर कोयत्याच्या सहाय्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. व्हॅनची पुढील व चालकाच्या बाजूची काच या हल्यात फुटली. पुढे बसलेल्या विद्यार्थ्यांला ही काच लागून तो किरकोळ जखमी झाला. या प्रकाराने घाबरलेले विद्यार्थ्यांनी आरडा ओरडा केला. यानंतर हे हल्लेखोर पळून गेले. या प्रकाराने व्हॅन मधील विद्यार्थी घाबरले. ही घटना कळताच पालक शाळेत पोहचले व मुलाना घरी नेले. भर रोडवर हा हल्याचा प्रकार घडला. व्हॅन मध्ये असणारी मुले ५ वी ते ९ वी वगार्तील होती. यामध्ये दोन मुलींचाही समावेश होता. या घटनेने पालक वर्गातही चिंतेची बाब पसरली. भर रस्त्यावर, भर सकाळी, गर्दीच्या ठिकाणी अशा प्रकारे हल्ले होणे गंभीर बाब आहे. पोलिसांनी ही बाब गांभीयार्ने घेवून असे हल्ले या पुढे होणार नाही यासाठी अत्यंत कडक कारवाई करायला पाहिजे. अशी प्रतिक्रिया अनेक पालकांनी व्यक्त केली. वाघोली व परिसरात ६० पेक्षा अधिक स्कूल आहेत.

वनविभागाच्या जमिनीवर उद्यानाचे आरक्षण टाकता येत नसल्याचा नवी मुंबई महापालिकेचा दावा

नवी मुंबई, भावना जैन :

नेरूळ सेक्टर ६० येथील जागांवर सिडकोच्या नोडल नकाशाप्रमाणे रहिवास वापर विभाग प्रस्तावित असून, वनविभाग अथवा महसूल विभागाने हा परिसर पाणथळ म्हणून घोषित केलेला नाही; तसेच अडवली-भूतावलीतील वनविभागाच्या मालकीच्या जमिनीवर केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या निदेर्शानुसार प्रादेशिक उद्यानाचे आरक्षण टाकता येत नसल्याचा दावा नवी मुंबई महापालिकेने केला आहे. शासनाकडे सादर केलेल्या प्रारूप विकास योजनेतील, महानगरपालिकेने प्रस्तावित केलेल्या बदलांमध्ये प्रसारमाध्यमांत प्रसारित झालेल्या वृत्तामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होऊ नये, म्हणून हे स्पष्टीकरण प्रशासनाने केले असल्याचे महापालिकेने म्हटले आहे. अडवली-भुतवली या गाव, तसेच आसपासच्या वनविभागाच्या क्षेत्राचा मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाच्या प्रादेशिक योजनेप्रमाणे 'प्रादेशिक उद्यान' या वापर विभागामध्ये समाविष्ट होत्या.

या गावामधील बहुतांश जमिनी या वनविभागाच्या मालकीच्या असल्याने अनेक वर्षांपासून त्यांचा वापर हा 'प्रादेशिक उद्यान' म्हणून दर्शविलेला होता. महानगरपालिकेच्या स्थापनेपासून म्हणजेच जवळपास ३१ वर्षांपासून सदर गावातील खासगी मालकीच्या जमिनींवर देखील 'प्रादेशिक उद्यान' हा वापर विभाग कायम होता. यामुळे संबंधित जमीनधारकाने केलेल्या सूचना व हरकती विचारात घेता व गेल्या अनेक वर्षांपासून सदरचे क्षेत्र विकसित न होऊ शकल्याने या सर्व बाबींचा सर्वंकष विचार करून नियोजनाच्या दृष्टिकोनातून येथील खासगी जमिनी रहिवास विभागात समाविष्ट करून त्यामध्ये रस्त्याचे जाळे व आवश्यक सोयीसुविधांचे आरक्षणे असा बदल प्रस्तावित केलेला आहे, असे महापालिकेने म्हटले आहे; मात्र हे खासगी जमीनधारक कोण, त्यांची नावे देणे प्रशासनाने टाळले आहे. प्रारूप विकास योजनेच्या बदलांवर शासनाच्या वतीने देखील सूचना व हरकती मागविण्याची तरतूद आहे.

'मर्यादा संपल्यावर मराठे करेक्ट कार्यक्रम करतात..'; मनोज जरांगेंचा मुख्यमंत्र्यांना इशारा

सोलापूर, सचिन कदम :

मागील काही दिवसांपासून मनोज जरांगे सतत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करतांना पाहायला मिळत आहे. अशात आता जरांगे यांनी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर देखील निशाणा साधत टीका केली आहे. 'मयार्दा संपल्यावर मराठे करेक्ट कार्यक्रम करतात' असे म्हणत मनोज जरांगेंनी आता थेट मुख्यमंत्र्यांना इशारा दिला आहे. जरांगे सोमवारी सोलापूर जिल्ह्याचा दौऱ्यावर होते. प्रसारमाध्यमान समोर बोलतांना त्यांनी शिंदे यांच्यावर टीका केली आहे. यावेळी बोलतांना मनोज जरांगे म्हणाले की, ह्लदेवेंद्र फडणवीस यांची भाषा आता एकनाथ शिंदे देखील बोलू लागले आहेत. एकनाथ शिंदे यांचे शब्द ऐकत आम्ही सहा महिने त्यांना वेळ दिला, पण ते देखील आता आम्हाला बोलू लागले आहेत. मयार्दा संपली की मराठे करेक्ट कार्यक्रम करत असतो. नऊ तारखेपर्यंत आम्ही वाट बघणार आहोत, त्यानंतर काय निर्णय घ्यायचा ते घेऊ. समाजाचे म्हणणे आहे की तुम्ही उपोषण करू नका. समाजाच्या विरोधात जाऊन राजकीय अस्तित्व निर्माण करता येणार नाही हे सरकारला लक्षात कसे येत नाही. सहा महिने तुम्ही आमचे फुकटचे घालवले आहात, आता आरक्षण गनिमी काव्याने कसे मिळवू ते तुम्हाला दाखवून देऊ, असेही जरांगे पाटील म्हणाले आहेत. पुढे बोलतांना मनोज जरांगे म्हणाले की, ₹ज्वलंत मराठा समाजाला अंगावर घेऊन, सरकार निवडणुका घेणार नाही. निवडणुका होणारच नाही, तर मराठा मतदान कोणाच्या बाजूने देणार हा प्रश्नच नाही. सरकारने जाणीवपूर्वक खोटे आरोप सुरु केले असून, कार्यकर्त्यांना गुंतवायला सुरु केलं आहे. सगेसोयऱ्यांच्या संदर्भात अधिसूचना काढली आहे, मात्र त्याची कोणतीही अंमलबजावणी केली जात नाही. दहा टक्के आरक्षण देऊन समाज समाधानी आहे, असे देवेंद्र फडणवीस बोलत आहेत. माझा राजकीय मार्ग नाही, पण मराठ्यांचा इतका ज्वलंत प्रश्न असताना सरकार निवडणुका घेणार नाही. शेकडोंची उमेदवारी दाखल करण्यासंदर्भात निर्णय समाजाने घेतला आहे, तो निर्णय समाजाचा आहे. तर, मी समाजाचा मालक नाही समाज माझा मालक असल्याचे जरांगे म्हणाले आहेत. यांच्या आजूबाजूला फिरणारे जे भ्रष्टाचारी आहेत त्यांच्यावर एसआयटी लावायला हवी, पण माज्यावर लावली आहे.

नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालयातील विभाग स्थलांतरामुळे रुग्णांसह त्यांच्या आप्तांचीही होतेय दमछाक

नाशिक, नितीन देवळेकर :

जिल्हा शासकीय रुग्णालयातील कॅज्युलिटी व आपत्कालीन विभाग सिंहस्थ इमारतीत हलविण्यात आल्यानंतर पोलिस चौकीतील कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी सतत चारशे ते पाचशे मीटर अंतराच्या फेऱ्या रुग्णांसह त्यांच्या आप्तांना माराव्या लागत आहेत. रुग्णाला उपचारार्थ दाखल केल्यावर एमएलसी करण्यासाठी वारंवार अशी भागमभाग करावी लागत असल्याने सारेच बेजार झाले आहेत. विभाग स्थलांतरामुळे पोलिसी कार्यवाहीतही बाधा निर्माण होऊन विलंब होत असून, आरोग्यसेवा व कागदपत्रांच्या पूर्ततेतील हे अंतर कमी करण्यासाठी प्रशासनाने निर्णय घेण्याची मागणी नागरिक करीत आहेत. जिल्हा शासकीय रुग्णालयातील कॅज्युलिटी व आपत्कालीन विभाग महिनाभरापासून नवीन ठिकाणी कार्यान्वित करण्यात आला आहे. सुसज्ज इमारत असली, तरी तेथील अडचणी अधिक आहेत. एकाच कक्षात वैद्यकीय उपचार, जखमींवर उपचार, वैद्यकीय तपासणी, पोलिसांची तपासणी, मृत्यूनंतरची कागदपत्रे तयार करण्याचे कामकाज सुरू आहे. त्यामुळे रुग्णदेखील त्रासले असून, पोलिसांनाही सतत चौकीपासून दूर गेलेल्या कक्षापर्यंत फेऱ्या माराव्या लागत आहेत. गंभीर बाब म्हणजे रुग्णाला उपचारार्थ दाखल केल्यावर वैद्यकीय तक्रार नोंदविण्यासाठी (एमएलसी) नातलगांना चौकीत यावे लागते. साधारण चार-पाच वेळेस अशी पायपीट संबंधितांना करावी लागत आहे.

पोटाला चिमटा घेऊन पैसे जमा केले, संस्थाचालकांनी हडपले; औरवाडच्या राजीव पतसंस्थेत साडेचार कोटीचा अपहार

कोल्हापूर, रोहित जसवाल : औरवाड, ता. शिरोळ येथील राजीव बिगर शेती सहकारी पतसंस्थेत संस्थाचालकांनी साडेचार कोटीचा अपहार केल्याचे उघडकीस आले आहे. या अपहारामुळे ग्रामीण भागातील मोलमजुरी करून पोटाला चिमटा घेऊन भविष्याची पुंजी सुरक्षित म्हणून संस्थेत ठेव ठेवणाऱ्या ठेवीदारांची गाळण उडाली आहे. संस्थाचालकांवर गुन्हा दाखल झाला असला तरी ठेवीदारांचे पैसे परत मिळणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

ग्रामीण भागातील लोकांच्या आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी सहकाराच्या माध्यमातून कर्ज पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी प्रतापराव आप्पाराव आगरे यांनी पुढाकार घेऊन १९९३ साली राजीव पतसंस्था स्थापन केली. सुमारे दीड हजार सभासदांचा विश्वास संपादन करत सुरुवातीच्या काळात संस्थेची आर्थिक बाजू भक्कम केली. मात्र आगरे याला संस्थेच्या आर्थिक सुबत्तेत सहकाराचा विसर पडून संस्थेच्या पंचविसाव्या वर्षातच स्वाहाकाराच्या प्रेमात पडले. शेतमजुरी करून घरचा चरितार्थ चालविताना स्वतःच्या पोटाला चिमटा घेत मुलांचे भविष्य उज्ज्वल व्हावे यासाठी कष्टाच्या मजुरीतून थोडी थोडी पुंजी साठवून राजीव पतसंस्थेत ठेवी ठेवणाऱ्यांची संख्या शेकडो आहेत. मात्र ठेवीदारांच्या ठेवीवर, सोने जिन्नसवर संस्थाचालकांनी ताव मारत गोरगरीब ठेवीदारांना भिकेकंगाल केले आहेत. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रतापराव आगरे यांनी आपला मुलगा शैलेंद्र याला २०१६ साली संचालक मंडळात घेऊन खऱ्या अर्थाने स्वाहाकाराला सुरुवात झाली. संस्थेवर सध्या प्रशासक असून लेखापरीक्षण करण्यात आले.

यामध्ये ठेव पावतीवर बनावट कर्ज काढणे, बनावट सोने गहाण, बनावट कागदपत्रे दाखवून कर्ज काढून रक्कम हडप केल्याचे लेखापरीक्षणात स्पष्ट झाले आहे. त्यामुळे लेखापरीक्षक संभाजी शिंदे यांनी संस्थेचे अध्यक्ष आगरे याच्यासह संचालक मंडळ, व्यवस्थापक अशा एकूण १२ जणांविरोधात पोलिसांत तक्रार दिल्याने गुन्हा दाखल झाला आहे.

दैनिक लोकरक्षणाय
www.lokrakshanay.com
ठाणे, मंगळवार, ५ मार्च २०२४

फरसाण पॅटिस

कधी कधी घरात नाश्त्यासाठी अक्षरशः ठणठणाट असतो. त्याच वेळी मुलांनाही डब्याला काहीतरी चटपटीत हवं असतं. कधी नाश्त्यालाच अचानक पाहुणे धडकतात. मग अशा वेळी हमखास मदतीला येणारा हा पदार्थ.

साहित्य- उरलेसुरलेले फरसाण, चिवडा, शेव, चकली. खारी बिस्कीटे, टोस्ट, बटर, शिजवलेला भात आणि बटाटे, आले, लसूण, गरम मसाला, सॉस, मीठ, साखर.

कृती – फरसाण, चिवडा, शेव, खारी बिस्किटे, टोस्ट, बटर यापैकी जे काही उरले असेल ते सर्व मिक्सरमध्ये फिरवून छान पूड करावी. आलं-लसूण वाटून घ्यावी. शिजवलेला भात आणि बटाटे कुस्करून घ्यावेत. त्यात ही फरसाण पूड एकत्र करावी. आता यामध्ये गरम मसाला, मीठ आणि चवीपुरती साखर घालावी. याचे छान चपटे वडे तळून घ्यावेत. सॉससोबत गरमागरम खावेत. गरम मसाला नसेल तरी हरकत नाही. घरामध्ये असलेला पिझ्झा मसाला, चाट मसाला असे काहीही चालू शकते.

पावसाळ्यामध्येही सनस्क्रीनचा वापर गरजेचा

अल्ट्रा व्हायोलेट रेजमुळे आपली त्वचा टॅन होऊ शकते, त्वचेवर सन बर्न होऊ शकतात आणि त्वचेवर अकाली वृद्धत्वाच्या खुणाही उमटू शकतात. त्यामुळे आपल्या त्वचेसाठी योग्य आणि आपण ज्या भागामध्ये राहतो, तिथले हवामान लक्षात घेऊन योग्य असे एसपीएफ असलेले सन स्क्रीन निवडणे गरजेचे असते.

न्यूयॉर्क येथे असलेल्या स्किन कॅन्सर फाऊंडेशननुसार पृथ्वीभोवतालच्या वातावरणामधील जवळजवळ ऐंशी टक्के अल्ट्रा व्हायोलेट रेज ढगांच्या कवचाला भेदून पृथ्वीपर्यंत पोहोचतात. याचाच अर्थ असा की आपण पावसाळ्यामध्ये किंवा गुलाबी थंडीमध्ये भटकंतीसाठी निघालो असू, आपल्याला सनस्क्रीनची गरज वर्षाचे बाराही महिने असते. अल्ट्रा व्हायोलेट रेजमुळे आपली त्वचा टॅन होऊ शकते, त्वचेवर सन बर्न होऊ शकतात आणि त्वचेवर अकाली वृद्धत्वाच्या खुणाही उमटू शकतात. त्यामुळे आपल्या त्वचेसाठी योग्य आणि आपण ज्या भागामध्ये राहतो तिथले हवामान लक्षात घेऊन योग्य असे एसपीएफ असलेले सनस्क्रीन निवडणे गरजेचे असते.

आता एसपीएफची मात्रा किती असावी हे कसे ओळखावे?

बहुतेक लोकांची अशी समजूत असते की सनस्क्रीनमध्ये जितके जास्त एसपीएफ, तितकी उन्हापासून त्वचेची जास्त सुरक्षा. पण असे नसून, सनस्क्रीनमधील एसपीएफची मात्रा, ते सनस्क्रीन उन्हापासून किती वेळाकरिता त्वचेचे संरक्षण करू शकेल हे दर्शवते. त्यामुळे सनस्क्रीन निवडताना २६ पेक्षा जास्त एसपीएफ असलेले सनस्क्रीन निवडावे. एसपीएफ ३० असलेले सनस्क्रीन आपल्या त्वचेला उन्हापासून साधारण दहा तासांपर्यंत संरक्षण देऊ शकते, तर एसपीएफ ५० असलेले सनस्क्रीन आपल्या त्वचेला १५ तासांपर्यंत उन्हाच्या दुष्परिणामांपासून वाचवू शकते.

सर्वसाधारणपणे एसपीएफ ३० असलेले सनस्क्रीन सर्वांत उपयोगी ठरते. पण हे सनस्क्रीन दिवसातून अनेक वेळा लावले तरच उन्हापासून आपल्या त्वचेला संरक्षण मिळते. अल्ट्रा व्हायोलेट किरणांमुळे त्वचेवरील सनस्क्रीनचे आवरण हळूहळू निकामी होत जात असल्याने, दर तीन तासांनी सनस्क्रीन लावल्याने फायदा होतो. हवा, म्हणजेच वारा आणि ऊन यांच्यामुळे त्वचा रुक्ष आणि कोरडी पडू शकते. अशा वेळी ॲलोव्हेरा, शिया बटर, आणि फळांची सत्त्वे असलेले सनस्क्रीन वापरावे.

सनस्क्रीन लावताना चेहरा, मान आणि हातांना, आणि विशेषतः शरीराचे जे अवयव कपड्याने झाकलेले नसतील तिथे सनस्क्रीन लावणे गरजेचे आहे. चेहरा, किंवा हातांच्या मागच्या बाजूची त्वचा जास्त नाजूक असल्याने त्यावर जास्त एसपीएफ असलेले सनस्क्रीन लावावे.

पावसाळा आणि आजारपण यांचं अगदी घट्ट नातंच आहे. एकीकडे वातावरणात बदल होतो आणि एक एक करत घरातील सगळेच खोकायला नाही, तर शिंकायला सुरुवात होते. कुटुंबातील एकाला जरी हा त्रास झाला तरी तो लगेच दुसऱ्यापर्यंत पोहोचतो. त्यात ज्यांची प्रतिकारशक्ती काहीशी कमी असते अशांना सर्दी-खोकला व्हायला अजिबातच वेळ लागत नाही. त्यामुळे या त्रासापासून तुमचा बचाव करायचा असेल तर या टिप्स तुम्हाला नक्कीच उपयोगी पडतील.

पावसाळ्यात असा करा सर्दी-खोकला आणि तापापासून बचाव!

- शक्यतो पावसात भिजू नका. भिजलात तर लगेच ओले कपडे बदला. अंग, डोके, केस लगेच कोरडे करा.
- सर्दी, खोकला, ताप आटोक्यात ठेवला नाही तर न्यूमोनिया होऊ शकतो.
- प्यायचे पाणी उकळताना सुंठ पावडर घाला. दिवसभर थोडे थोडे गरम पाणी प्या, घसा शेकला जाईल, शरीरातील टॉक्झिन्स निघून जातील.
- व्हायरल ताप असेल तर पाण्यात तुळस, मध, हळद घालून काढा करा. गरम गरम प्या. हर्बल टीनेही तापाचा परिणाम कमी होतो.
- पाण्यात हळद घालून त्या पाण्याने किंवा सलाईन वॉटरने गुळण्या करा.
- पावसात भिजल्यावर कपडे ओले असताना एसी रूममध्ये जाऊ नका.
- दम्याचा त्रास असणाऱ्यांनी दमट, ओल्या भिंतींपासून लांब राहा. भिंतींवर बुरशीची वाढ झालेली असल्यास दम्याचा त्रास वाढू शकतो.
- निलगिरी तेलाचे थेंब रुमालावर घेऊन अधूनमधून हुंगा. चोंदलेले नाक मोकळे होण्यासाठी निलगिरी तेलाचे थोडे थेंब पाण्यात घालून उकळवून वाफारा घ्या. श्वास घेणं सोपं झालं की, पूर्ण शरीराला आराम मिळेल.
- चपला, बूट, मोजे, रेनकोट, चादरी, उशा कोरड्या आणि स्वच्छ ठेवा.

लिंबू कंसोम

साहित्य : लिंबाचा रस १/४ वाटी, कोथिंबीर २ वाट्या, गूळ ३ चमचे, आलं वाटून दीड चमचा, कडुलिंब २ काड्या, मिरे १ चमचा, तूप १ चमचा, हळद १/२ चमचा, मोहरी १ चमचा, मीठ चवीनुसार.

कृती : पॅनमध्ये तूप तापवून, मोहरी घालून तडतडू दे. कडुलिंबाची पाने घालून ढवळून घ्या. अडीच कप पाणी घालून उकळी आणा. हळद आणि मीठ घाला. मिरे भरडून जाडसर पूड करा. कोथिंबीर भरडून घ्या. पॅनमध्ये वाटलेलं आलं, मिरपूड आणि कोथिंबीर घाला. उकळी आणा. गूळ घाला. ५ मिनिटे उकळू द्या. गॅसवरून उतरवून गाळून घ्या. नंतर लिंबाचा रस घालून सर्व्ह करा. सर्दी, खोकला, तापापासून बचाव करण्यासाठी उपयुक्त. हे डिटॉक्स ड्रिंक आहे. प्रतिकारशक्ती वाढते, भूक वाढते, अन्नपचन सुधारते. तोंडाला चव येते.

कांद्याचे गुणधर्म

पांढरा कांदा व लाल कांदा यांचे औषधी गुणधर्म जवळजवळ सारखेच असतात. क्वचितच थोडाफार कमी-जास्त गुण येऊ शकतो. अजिर्णाचा त्रास होत असल्यास कांद्याचा व कारल्याचा रस एकत्र करून प्यावा. दीर्घ मुदतीच्या तापानंतर शरीर अशक्त होते, अशा वेळेस कांदा तुपामध्ये परतवून खावा. जुनाट तापावर कांदा शिजवून खाल्ल्यानेही फायदा होतो. कांद्याच्या सेवनाने तोंड स्वच्छ होते. कफ दूर होतो. तोंडाचा चिकटा नाहीसा होतो. स्नायूंची दुर्बलता नाहीशी होते. स्मरणशक्ती वाढते. पोटामध्ये गॅस धरल्यास कांद्याच्या रसात चमचाभर साखर व अर्धा चमचा तूप घालून प्यावे. मूळव्याधीतून रक्त वाहत असल्यास बारीक चिरलेला कांदा दह्यात घालून थोडे मीठ घालून ते मिश्रण एकत्र करून रोज सकाळी खावे.

घरचं वायफाय सुरक्षित ठेवायचंय? फॉलो करा या टीप्स

आजकाल घरोघरी वायफाय कनेक्शन आलं आहे. पण आपण वापरत असलेलं आपलं कनेक्शन किती सिक्युअर्ड आहे, याचा कधी विचार केला आहे का? तर घरचं वायफाय नेटवर्क सिक्युअर करण्यासाठी काही खास टीप्स तुम्ही फॉलो करू शकता.

आजकाल इंटरनेट फक्त मनोरंजनाची नाही तर फार गरजेची गोष्ट बनली आहे. आजकाल इंटरनेटशिवाय जीवनाची कल्पना करणंही अवघड आहे. म्हणजे ऑनलाइन शिक्षणापासून ते ऑफिसचं काम वर्क फ्रॉम होम झाल्यापासून घरोघरी इंटरनेट सेवा आली आहे. त्यामुळेच आजकाल सर्वांच्या घरामध्ये वायफाय मिळत आहे. घरातील सर्व गॅझेट्स जसे की लॅपटॉप, स्मार्टफोन, टीव्ही, ॲमेझॉन अलेक्सा आणि इतर प्रोडक्ट्स वायफायशी कनेक्ट असतात. आपला सर्व महत्त्वाचा डेटा यात असतो, त्यामुळे आपलं इंटरनेट कनेक्शन सुरक्षित असणंही गरजेचं आहे. तर तुमचं वायफाय सुरक्षित आहे का? आणि ते सुरक्षित करण्यासाठी तुम्ही काय करू शकता, यासाठी आम्ही काही खास टीप्स आज सांगणार आहोत, ज्यांच्या मदतीने तुम्ही तुमचे वायफाय कनेक्शन सुरक्षित करू शकता.

- तुमच्या होम नेटवर्कचे डीफॉल्ट नाव आणि पासवर्ड कधीही वापरू नका. नेटवर्कचे नाव बदलण्यासाठी, प्रथम विंडोज कमांड प्रॉम्प्टवर जा, येथे "ipconfig" टाइप करा आणि नंतर इंटरनेट ब्राऊझरवर जा आणि तुमचा आयपी ॲड्रेस शोधा. त्यानंतर तुमच्या राऊटरचे लॉगिन क्रेडेंशियल एंटर करा आणि वायफाय सेटिंग उघडा आणि एसएसआयडी आणि पासवर्ड बदला.
- तुमची वायफाय क्रेडेन्शियल्स

या टीप्स करा फॉलो

तुम्हाला माहीत नसलेल्या लोकांसोबत शेअर करू नका. तुम्हाला जबरदस्ती एखाद्याला काही वेळासाठी वायफाय द्यावं लागलं तरीही तुम्ही गेस्ट नेटवर्क तयार करू शकता, जेणेकरून तुमच्या प्राथमिक वायफायशी कनेक्ट केलेल्या उपकरणांची माहिती तिसऱ्या व्यक्तीला मिळणार नाही.

- वायफाय एन्क्रिप्शन चालू ठेवा. याचा फायदा असा होईल की वायरलेस चॅनल आणि डिव्हाइस दरम्यान शेअर केलेला डेटा एनक्रिप्टेड राहील.
- जेव्हा तुम्ही वायफाय वापरत नसाल किंवा घराबाहेर जात असाल तेव्हा ते बंद करा, जेणेकरून कोणीही नेटवर्कमध्ये प्रवेश करू शकणार नाही.
- तुमच्या वायफाय नेटवर्कचे फर्मवेअर त्याच्या अधिकृत वेबसाइटवरून नियमितपणे डाऊनलोड करत राहा.

पॅट कमिन्स सनरायझर्स हैदराबादचा नवा कर्णधार

ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज पॅट कमिन्स आयपीएल स्पर्धेत सनरायझर्स हैदराबाद संघाचा नवा कर्णधार असेल. ॲशेस मालिका विजेता कर्णधार, वर्ल्डकपविजेता कर्णधार तसंच वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप विजेता कर्णधार असा कर्णधारपदाचा तगडा अनुभव कमिन्सच्या नावावर आहे. सनरायझर्स हैदराबाद संघाने लिलावात तब्बल २०.५ कोटी रुपये खर्चून कमिन्सला ताफ्यात दाखल करुन घेतलं होतं. त्याचवेळी तो संघाचा कर्णधार होणार असे संकेत मिळाले होते. कमिन्स आयपीएल स्पर्धेत याआधी कोलकाता नाईट रायडर्स आणि दिल्ली कॅपिटल्स संघाकडून खेळला आहे. पण या संघांनी त्याच्याकडे नेतृत्वाची धुरा सोपवली नव्हती. वेगवान गोलंदाज असल्याने कमिन्सला दुखापतींची शक्यता आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलिया कमिन्ससाठी वर्कलोड मॅनेजमेंट राबवतं. एका वेगवान गोलंदाजाकडे संघाची धुरा सोपवणार का असा प्रश्न होता. पण सनरायझर्स व्यवस्थापनाने कमिन्सचीच प्राधान्याने निवड केली आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटवर लक्ष केंद्रित करण्यासाठी कमिन्सने गेल्या वर्षीच्या हंगामातून माघार घेतली होती. कमिन्सने २०१४ मध्ये आयपीएल पदार्पण केलं. या स्पर्धेत ४२ सामन्यात त्याच्या नावावर ४५ विकेट्स आहेत. २०२२ हंगामात कमिन्सने मुंबई इंडियन्सविरुद्ध खेळताना अवघ्या १४ चेंडूत अर्धशतक पूर्ण केलं होतं. आयपीएल स्पर्धेत सगळ्यात कमी चेंडूत अर्धशतक झळकावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत कमिन्स दुसऱ्या स्थानी आहे. गेल्या हंगामात एडन मारक्रमने हैदराबादचं नेतृत्व केलं होतं. कुमार संगकारा, कॅमेरुन व्हाईट, शिखर धवन, डॅरेन सॅमी, डेव्हिड वॉर्नर, केन विल्यमसन, भुवनेश्वर कुमार आणि मनीष पांडे यांनी हैदराबादचं नेतृत्व केलं आहे. वॉर्नरच्या नेतृत्वात २०१६ मध्ये सनरायझर्स संघाने जेतेपदावर कब्जा केला होता. मात्र वॉर्नर आणि हैदराबाद संघव्यवस्थापन यांच्यात बेबनाव निर्माण झाला आणि संघाची लयच हरपली. वॉर्नरनंतर केन विल्यमसनने नेतृत्व केलं. आता वॉर्नर आणि केन दोघेही हैदराबाद संघात नाहीत.

दै. लोकरक्षणाय सुडोकू - २३

1		2			5	7	9	
	9	3		7		5	8	4
				3				
		9	4		6			5
	4	1		5				
	5				7		1	
	6		7		3			
	3	4		8		2	7	
			9					

उत्तर सुडोकू -२२

4	2	8	9	3	7	1	5	6
6	5	1	4	8	2	9	7	3
7	9	3	1	5	6	8	2	4
8	1	6	2	4	3	5	9	7
3	4	2	5	7	9	6	1	8
5	7	9	6	1	8	3	4	2
9	3	4	7	6	1	2	8	5
1	8	7	3	2	5	4	6	9
2	6	5	8	9	4	7	3	1

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

राजस्थानचा सलामीचा फलंदाज रोहित शर्माचं निधन; ४० व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

माजी रणजीपटू रोहित शर्माचे शनिवारी ४० व्या वर्षी निधन झाले. राजस्थान रणजी क्रिकेट संघातील क्रिकेटपटू रोहित शर्माने सलामीवीर म्हणून यापूर्वी अनेक सामने खेळले होते. रोहित शर्मा मागील काही दिवसांपासून आजारी होता. रोहित शर्मा याला यकृताशी संबंधित समस्या होत्या आणि चार-पाच दिवसांपूर्वी शहरातील रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं, जिथे त्याच्यावर उपचार सुरू होते. मात्र, उपचारादरम्यान शनिवारी त्याचं निधन झालं.एकीकडे राजस्थानचा सलामीवीर रोहित शर्माचे निधन झाले असताना नावामुळे सोशल मीडियावर काही प्रमाणात गोंधळ सुद्धा पाहायला मिळत आहे. निधनाची माहिती समोर येताच काहींनी भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा याच्या फोटोसह पोस्ट केल्या होत्या. मात्र हा गोंधळ दूर होताच रोहितच्या फॅन्सनी सुटकेचा निश्वास सोडला आहे. रोहित शर्माच्या क्रिकेटमधील योगदानाविषयी सांगायचे तर त्याने संपूर्ण कारकिर्दीत २८ एकदिवसीय रणजी सामने खेळले होते, ज्यात राजस्थानच्या रणजी क्रिकेट संघाकडून त्यांनी सात रणजी सामन्यांचा समावेश आहे.

दिनविशेष

५ मार्च

- १५५८: फ्रान्सिस्को फर्नांडिस यांनी धुम्रपान बनवण्यात पहिल्यांदा तंबाखूचा वापर केला.
- १६६६: छत्रपती शिवाजी महाराज यांनी रायगडावरून आग्र्याला प्रयाण केले.
- १८५१: जिओलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडिया ची स्थापना झाली.
- १९३१: दुर्सया गोलमेज परिषदेपुर्वी गांधी-आयर्विन करार झाला.
- १९३३: भयानक मंदीमुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डी. रुझव्हेल्ट यांनी सर्व बँका काही दिवसांसाठी बंद केल्या व आर्थिक व्यवहारांवर बंदी घातली.
- १९६६: म्हैसूरचे राजे वाडियार यांचा बंगळुरूमध्ये असेलेला राजवाडा सरकारच्या ताब्यात घेण्याचा विधेयक मंजूर झाला.
- १९९७: संत ज्ञानेश्वरांची प्रतिमा असलेले टपाल तिकीट प्रकाशीत झाले.
- १९९७: धार्मिक जनजागृतीबद्दल दिला जाणारा जॉन एम. टेम्पलटन पुरस्कार पांडुरंगशास्त्री आठवले यांना जाहीर करण्यार आला.
- १९९८: रशियाकडून घेतलेल्या सिंधुरक्षक पाणबुडीचे मुंबईत आगमन झाले.
- २०००: कर्नाटकातील कैगा अणू वीजप्रकल्प पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते देशाला समर्पित केला.
- २००७: राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण अयोग्य स्थापना
- १५१२: नकाशाकार आणि गणितज्ञ गेर्हाट मार्केटर यांचा जन्म. (मृत्यू: २ डिसेंबर १५९४)
- १८९८: चीनचे राष्ट्राध्यक्ष चाऊ एन लाय यांचा जन्म. (मृत्यू: ८ जानेवारी १९७६)
- १९०८: ब्रिटिश आणी अमेरिकन रंगभूमीवरील आणि हॉलिवूड चित्रपटांतील अभिनेते सर रेक्स हॅरिसन यांचा जन्म. (मृत्यू: २ जून १९९०)
- १९१०: संपादक श्रीपाद वामन काळे यांचा जन्म.
- १९१३: किरण घराण्याच्या शास्त्रीय गायिका गंगुबाई हनगळ यांचा जन्म. (मृत्यू: २१ जुलै २००९)
- १९१६: ओरिसाचे मुखमंत्री आणि स्वातंत्र्य सेनानी बिजू पटनायक यांचा जन्म. (मृत्यू: १७ एप्रिल १९९७)

भविष्य

मेष नटण्याची हौस पूर्ण कराल. तुमचे व्यक्तिमत्व प्रभावी ठरेल. आनंदी दृष्टीकोन ठेवाल. प्रेमाच्या दृष्टीने नवीन मैत्री लाभेल.

वृषभ प्रवासात आरोग्याची काळजी घ्यावी. कामात चंचलता आड येऊ शकते. भावंडांची बाजू जाणून घ्यावी. टीकेकडे दुर्लक्ष करावे.

मिथुन मुलांच्या वेगळ्या खर्चाचे नियोजन करावे. घेतलेल्या ज्ञानाचा योग्य उपयोग होईल. काहीसे छांदीष्टपणे वागाल.

कर्क उत्तम वाहन सौख्य लाभेल. घरातील ज्येष्ठांची मदत होईल. मनाचा सज्जनपणा दाखवाल. हसत खेळत सर्व गोष्टी पार पडाल. सजावटीच्या वस्तु खरेदी कराल.

सिंह दूरच्या प्रवासाचा योग येईल. मनातील निराशा बाजूस सारावी. चंचलतेत वाढ होऊ शकते. जवळचे मित्र भेटतील. भावंडांच्या समस्या समजून घ्याल.

कन्या जुन्या कामातून लाभ होईल. पैशाचा सदुपयोग कराल. खाण्या पिण्याबाबत चोखंदळ राहाल. मौल्यवान वस्तूंची आवड दर्शवाल. व्यावसायिक लाभ उत्तम होईल.

तुला आपले कर्तव्य योग्य रीतीने बजावाल. आपले मत इतरांना मान्य करायला लावाल. प्रशासकीय भूमिका घ्याल. कामाचा उरक वाढेल. चिकाटीने कामे कराल.

वृश्चिक आध्यात्मिक उन्नती साधण्याचा प्रयत्न कराल. ऐहिक गोष्टींची कामना करू नये. मनात नसतानाही प्रवास करावा लागेल. ढोंगी लोकांविषयी तिटकारा दाखवाल. ठाम निर्णयावर भर द्यावा.

धनु अचानक धनलाभ संभवतो. मित्रांशी मतभेद संभवतात. योग्य संधीसाठी वाट पहावी लागेल. मनातील इच्छा पूर्ण होईल. भडकपणे मत मांडू नका. करमणुकीसाठी अधिक वेळ घालवाल.

मकर जोडीदाराची कर्तबगारी दिसून येईल. शांत संयमी विचार कराल. कामात पत्नीचा हातभार लाभेल. जबाबदारीने कामे उरकाल. चार-चौघांत कौतुक केले जाईल. प्रकृतीची किरकोळ तक्रार जाणवेल.

कुंभ अधिकारी व्यक्तींचे मार्गदर्शन घ्यावे. कामातील दिरंगाई टाळावी. श्रद्धेची बाजू लक्षात घ्यावी. वडीलांच्या मताचा आदर करावा. इतरांना आनंदाने मदत कराल.

मीन मुलांचा उडणारा गोंधळ दूर करावा. सतत काळजी करत बसू नये. रेस जुगारातून लाभ संभवतो. भावनेच्या भरात वाहवून जाऊ नये. आवडीचे पदार्थ खायला मिळतील.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

संपादकीय

महाराष्ट्रातील प्री वेडिंग समारंभ!

देशातील आघाडीचे उद्योगपती मुकेश अंबानी यांचे पुत्र अनंत आणि राधिका मर्चंट यांचा प्री वेडिंग समारंभ गुजरातमधील जामनगर येथे शनिवारी मोठ्या धुमधडाक्यात झाला. या समारंभासाठी केवळ देशभरातूनच नव्हे तर जगभरातून नामवंत सेलिब्रिटींना बोलावण्यात आले होते. त्यांना त्यांची मुहबोली किंमत देण्यात आली होती. काही लोक तर केवळ अंबानी यांच्यासारख्या देशातील अग्रगण्य उद्योगपतीच्या मुलाच्या प्री वेडिंग समारंभाला उपस्थित राहण्याची संधी मिळते, म्हणून आलेले होते. कारण अंबानींकडून आपल्याला केवळ निमंत्रण मिळणे हीदेखील खूप मोठी गोष्ट आहे, याची त्यांना कल्पना होती.अंबानी यांनी जामनगरमध्ये रिफायनरीच्या माध्यमातून आपले मोठे औद्योगिक साम्राज्य उभे केले असले तरी त्यांच्या वडिलांच्या औद्योगिक जीवनाची सुरुवात ही महाराष्ट्रातून झालेली आहे. उद्योगपतीला कुठलाही राजकीय पक्ष वर्ज्य नसतो आणि कुठल्याही राजकीय पक्षाला किंवा नेत्याला कुठलाही उद्योगपती वर्ज्य नसतो. त्यामुळे अंबानी यांच्या मुलाला त्यांच्यावर टीका करणारे राजकीय नेतेही गेले होते. अंबानी यांच्या मुलाचे प्री वेडिंग जोरदार म्हणजे जागतिक प्रसारमाध्यमांचे लक्ष वेधून घेणारे ठरले. कारण त्यांनी अनेक जागतिक कीर्तिच्या सेलिब्रिटींना खरेदी केले होते. या माध्यमातून त्यांनी एक उद्योगपती म्हणून स्वतःची आणि भारताची ताकद जगभरात दाखवून दिली. अशी माहिती आहे की, प्री वेडिंग समारंभासाठी आलेल्या एका विदेशी सेलिब्रिटी नतकीर्ने काही दिवसांपूर्वी भारत हा गरीब देश आहे, असे म्हटले होते. तिला अंबानी यांनी मागेल ती किंमत देऊन आपल्या मुलाच्या विवाहपूर्व समारंभासाठी यायला भाग पाडले आणि भारताची श्रीमंती दाखवून दिली.एका बाजूला जामनगरमध्ये अंबानी यांच्या पुत्राच्या प्री वेडिंग समारंभाने जगाचे लक्ष वेधून घेतलेले असताना भारतात होणाया लोकसभा निवडणुकीकडेही जगाचे लक्ष लागलेले आहे. कारण नरेंद्र मोदी त्यांच्या नेतृत्वाखाली जर देशात पुन्हा भाजपची सत्ता आली तर ती त्यांची हॅट्रिक असेल, पण यावेळी मोदींना केवळ हॅट्रिक नको, तर अब की बार चारसौ पार करायचे आहेत. त्यासाठी त्यांचे शथीर्चे प्रयत्न सुरू आहेत. देशभरात लोकसभेची आणि त्यानंतर महाराष्ट्रात होणारी विधानसभेची निवडणूक भाजपसाठी अतिशय महत्वाची आहे. लोकसभेत भाजपला ४०० पार करायचे आहेत. पण तरीही मोदींनी एनडीएचे लक्ष्य ४०० पार असे म्हटले आहे. कारण एनडीएमध्ये असलेल्या आपल्या मित्र पक्षांचा कल आपल्या विरोधात जाऊन त्याचा फायदा आपल्या विरोधात असलेल्या इंडिया आघाडीला मिळू नये, असा त्यामागे विचार असावा. कारण केवळ भाजप असे म्हटले तर मित्र पक्ष नाराज होऊ शकतात.जे इंडिया आघाडीत दिसून आले. कारण या आघाडीतील मुख्य पक्ष असलेल्या काँग्रेसने एकट्याने निवडणुका लढवण्याचा निर्णय काही राज्यांमध्ये घेतला. इतकेच नव्हे तर मित्र पक्षांना जास्त जागा दिल्या नाहीत, त्यामुळे त्यांची नाराजी ओढवून ममता बॅनर्जी यांनी आपली वेगळी भूमिका घेतली. आम आदमी पार्टी वेगळी झाली. त्यामुळे इंडिया आघाडीतील हवा निघून गेली. त्यात पुन्हा या आघाडीचे निमंत्रक असलेले नितीश कुमार त्यातून बाहेर पडले आणि भाजपच्या पंक्तीला जाऊन बसले. नरेंद्र मोदी यांनी एनडीएचे नाव घेतले असले तरी यांना भाजपनेच ४०० पार करावे असे वाटत असणार यात शंका नाही, कारण एका पक्षाच्या बहुमताची काय ताकद असते, याचा अनुभव यांनी मागील दोन टर्ममध्ये घेतला आहे.इंडिया आघाडीचे घोडे जागावाटपावरून अडलेले असताना तिकडे भाजपचे सरचिटणीस विनोद तावडे यांनी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर देशभरातल्या 195 उमेदवारांची यादी जाहीर केली. या यादीत एकूण 34 मंत्र्यांना स्थान देण्यात आले आहे. भाजपने पहिल्या यादीत 28 महिला उमेदवारांची नावेदेखील जाहीर केली आहेत. त्यामुळे भाजपने लोकसभा निवडणुकीवर विरोधकांवर आघाडी घेतली आहे. पण या यादीमध्ये महाराष्ट्रातील कुठल्याच उमेदवाराचे नाव जाहीर करण्यात आलेले नाही. नितीन गडकरी यांच्यासारख्या वजनदार मंत्र्याचे नावही या यादीत नाही, त्यामुळे आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. याचा अर्थ महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकांचे जागावाटप हा किती गुंतागुंतीचा मामला आहे याचा अंदाज यावरून येऊ शकतो. कारण महाराष्ट्रात भाजपची सत्ता असली तरी ती एकट्याची नाही, त्यात एकनाथ शिंदे आणि अजित पवार असे दोघे भागीदार आहेत. त्यांनी भाजपसोबत महायुती केलेली असली तरी त्यांचे पक्ष स्वतंत्र आहेत. त्यामुळे लोकसभेचे तिकीट वाटप करताना त्यांचा योग्यतो विचार करावा लागणार आहे. त्यानंतर विधानसभा निवडणुकीत जागावाटपाची परिस्थिती आणखी गुंतागुंतीची होईल. कारण भाजपने महाराष्ट्रात पुन्हा सत्ता आणण्यासाठी एकनाथ शिंदे यांना सोबत घेऊन ठाकरे यांना शह दिला. त्याचसोबत सरकार स्थिर असताना लोकसभा निवडणुकीत शरद पवारांना शह देण्यासाठी त्यांनी अजित पवारांना सोबत घेतले. पण आता या नव्या सहकार्यांना तिकिटे द्यावी लागणार आहेत, कारण ऐन निवडणुकीच्या तोंडावर त्यांची नाराजी परवडणारी नाही. लोकसभा आणि विधानसभा निवडणुका हे लग्न मानले तर त्या अगोदर होणाया प्री वेडिंग समारंभाला कोण कसे रंग भरतो, त्यावर पुढील वेडिंग म्हणजेच लग्न कसे होणार हे अवलंबून आहे.

उपभोगशून्य वाढ!

देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात (ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट-जीडीपी) आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत ८.४ टक्के इतकी वाढ नोंदली गेली ही आनंदवार्ताच. ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर या तिमाहीचा हा तपशील नुकताच जाहीर झाला. या तिमाहीच्या उत्तम कामगिरीची ही आनंदवार्ता निवडणुकांच्या तारखा घोषित होण्याआधी प्रसृत झाली याचा ह्यअर्थाअर्थीह्न काही संबंध आहे असा संशय घेण्याचे काही कारण नाही. तसेच अधोगतीप्रमाणे प्रगतीचा अंदाज बांधण्यातही आपली रिझर्व्ह बँक अपयशी ठरली याबाबतही छिद्रान्वेषी दृष्टिकोनातून विचार करणे योग्य नाही. रिझर्व्ह बँकेच्या मते या तिमाहीत अर्थगती ६.५ टक्के असणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात ही वाढ ८.४ टक्के इतकी नोंदली गेली. म्हणजे साधारण दोन टक्क्यांनी आपल्याच रिझर्व्ह बँकेचा आपल्याच अर्थगतीबाबतचा कयास चुकला. ही काही टिंगल करावी अशी बाब नाही. कारण या तिमाहीबाबत अनेकांचे अंदाज चुकले.

अर्थात चांगले काही होईल अशी अपेक्षा असताना प्रत्यक्षात त्याउलट घडल्याने होणाऱ्या दुःखापेक्षा बऱ्या कामगिरीची अपेक्षा असताना प्रत्यक्षात ती उत्तम होत असेल तर या अंदाजचुकीबाबत कळवळण्याचे काहीही कारण नाही. या अंदाज चुकीमुळे २०२३-२४ या आर्थिक वर्षाची वाढीचा वेग ७.६ टक्के इतका होईल. ही अंदाजचूक झाली नसती तर आपली अर्थव्यवस्था ७.३ टक्क्यांनी वाढली असती. म्हणजे या अंदाजचुकीने ०.३ अंशाची नक्त वृद्धी होईल. तेवढी तर तेवढी! जगातील बड्या अर्थव्यवस्था दोनपाच टक्क्यांनी वाढत असताना आपण सात टक्क्यांची घसघशीत वाढ नोंदवणे हे केव्हाही अभिमानास्पदच. तेव्हा याबाबत आनंद व्यक्त करून या वाढीचे रास्त विश्लेषण करणे इष्ट. कारखानदारी, खाणउद्योग, गृहबांधणी, हॉटेले, पर्यटन इत्यादी क्षेत्रांनी या तिमाहीत उत्तम कामगिरी नोंदवली.

हा सणासुदीचा काळ. दांडिया, दिवाळी, नाताळ आणि नववर्ष इत्यादी सणउत्सव या काळात येतात. सणासुदीच्या काळात भारतीय एरवीचा आखडता हात सैल सोडतो. ऋण काढून सण साजरा करणे आपणात प्रचलित आहेच. तेव्हा या काळात अर्थव्यवस्थेस गती येणे अपेक्षित. त्यासाठी या काळात महादुकानांपासून महाउद्योगांपर्यंत खरेदीस उत्तेजन दिले जाते. तसे झाले. आपले सणवार हे कृषीचक्राशी निगडित आहेत. सगळे महत्त्वाचे उत्सव या काळात येतात कारण बळीराजा नावे गोंजारल्या जाणाऱ्या शेतकरी वर्गाच्या हाताशी चार पैसे खुळखुळत असतात. आपली अर्थव्यवस्था अद्यापही कृषीप्रधान. अर्थव्यवस्था दोन दोन टक्क्यांच्या ढांगा टाकत पुढे जात असताना कृषी क्षेत्रानेही या काळात रास्त प्रगती नोंदवलेली असणे तर्कसंगत. तथापि ताज्या आकडेवारीत या शेतीच्या मुद्द्यावर पहिली माशी शिंकते. गत आर्थिक वर्षात या काळात कृषी क्षेत्र तब्बल ५.२ टक्के इतकी लक्षणीय वाढ नोंदवत असताना विद्यामान आर्थिक वर्षातील या तिमाहीत तेच कृषीक्षेत्र ०.८ इतकी वाढ नोंदवते. ती देखील उणे. म्हणजे प्रत्यक्षात या काळात आपले कृषीक्षेत्र आकुंचले. या क्षेत्राने प्रगती नोंदवणे सोडा, उलट त्याची अधोगती झाली. अर्थगती वृत्ताच्या बासुंदीत हा पहिला मिठाचा खडा. अर्थगती मापनात सकल राष्ट्रीय उत्पन्न जितके महत्त्वाचे तितकाच सकल मूल्य वृद्धी (ग्रॉस व्हॅल्यू ॲडिशन- जीव्हीए) हा घटकही महत्त्वाचा. सकल राष्ट्रीय उत्पन्न हे देशांतर्गत समग्र सेवा आणि उत्पादने यांचे मूल्य दर्शवते तर सकल मूल्य वृद्धी एककातून अर्थव्यवस्था वाढीतील प्रत्येक घटकाचे उदाहरणार्थ उद्योग, कृषी, सेवा इत्यादींचे मापन होते. म्हणजे एखाद्या विद्यार्थ्यास परीक्षेत किती गुण मिळाले ते सर्वसाधारण टक्केवारीतून ८० टक्के, ८५ टक्के इत्यादी समजते. ही टक्केवारी म्हणजे सराउ. (जीडीपी). तर या परीक्षेत कोणते विषय होते आणि त्या प्रत्येकात किती गुण मिळाले हे विषयवार आकडेवारीनुसार लक्षात येते. हे विषयवार विश्लेषण म्हणजे समूवृ. (जीव्हीए). ही इतकी साधी बाब. ती लक्षात घेतल्यास कोणालाही कळेल की जर एखाद्यास सर्वसाधारण ८० टक्के गुण मिळालेले असतील तर त्यास सर्व विषयांत मिळालेल्या गुणांच्या बेरजेस विषयांच्या संख्येने भागल्यास ते उत्तर ८० टक्के यायला हवे. येथे आपल्या अर्थगतीच्या आकडेवारीत मिठाचा दुसरा खडा पडतो. आपले सराउ ८.४ टक्के आहे पण समूवृ आहे फक्त ६.५ टक्के. म्हणजे विद्यार्थी सांगताना आपणास ८४ टक्के गुण मिळाले असे सांगतो; पण प्रत्यक्षात त्यास विषयावर पडलेल्या गुणांची सरासरी मात्र जेमतेम ६५ टक्के इतकीच. हे कसे? हा खरा प्रश्न. म्हणून एखाद्या विद्यार्थ्याने असे केल्यास त्यास काय म्हणतात याचा विचार केल्यास देशाच्या सांख्यिकी विभागाने तसेच केल्यास त्यास काय म्हणायचे हा व्यापक प्रश्न. देशातील सरकारी मालकीच्या बँका, उद्योगपती आणि खुद्द सरकार हे ८.४ टक्क्यांचे यश साजरे करीत असताना त्याचवेळी बड्या आणि कार्यक्षम खासगी बँकांतील अर्थविश्लेषक मात्र सुमारे दोन टक्क्यांच्या फरकाने चक्रावून गेलेले दिसतात. ते चक्रावणे समजावून घ्यावयाचे असेल तर कारखानदारी आणि कृषी या दोन विषयांत मिळालेले गुण विचारात घ्यावे लागतील. विद्यामान तिमाहीत कारखानदारीने नोंदलेली ११.६ ही वाढ नेत्रदीपक. पण ही वाढ कशाच्या जोरावर? गतसाली याच तिमाहीत कारखानदारीची वाढ उणे ४.८ टक्के इतकी होती. यावेळी ती ११.६ टक्के इतकी आहे. म्हणजे प्रत्यक्षात ती जेमतेम सहा टक्केच म्हणायची. एखाद्यास एका परीक्षेत १०० पैकी १० गुण मिळाले आणि त्याने नंतरच्या परीक्षेत आपल्या गुणांत ४०० टक्के इतकी वाढ केली तरी प्रत्यक्षात ते गुण ४० इतकेच भरतात. ही वाढच. पण तरी जेमतेम उत्तीर्ण. त्याचवेळी जे कृषीक्षेत्र घसघशीत अशी ५.२ टक्के इतकी वाढ गतसाली नोंदवत होते ते सध्याच्या तिमाहीत शून्याखाली ०.८ इतके गडगडले. तेव्हा अर्थव्यवस्थेच्या गुणांचे विश्लेषण केल्यास हे चित्र दिसते. मग ते इतके साजिरे कसे, असा प्रश्न पडणे नैसर्गिक.सरकार हे त्याचे उत्तर. अर्थव्यवस्थेच्या गतीची दोन चाके महत्त्वाची. सरकार आणि खासगी क्षेत्र. सद्याःस्थितीत अर्थव्यवस्थेचा गाडा ओढण्याची जबाबदारी प्रामुख्याने सरकारनेच घेतलेली दिसते.

मोठमोठी कामे काढणे, पायाभूत सोयीसुविधांची उभारणी, विमानतळे/रेल्वेची कंत्राटे इत्यादी मार्गांनी सरकार पैसा खर्च करत असून त्याचवेळी खासगी क्षेत्र मात्र कंजुषाप्रमाणे आपला हात आखडताना दिसतात. आपल्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास आणि अन्य तत्सम अधिकारी विविध परिषदांतून खासगी क्षेत्रास हात सैल सोडण्याचे आवाहन करतात, ते याचमुळे. सरकार एकट्याने अर्थव्यवस्थेचा गाडा किती रेटू शकते यास मयार्दा आहेत. हे सत्य ८.४ टक्के विकासदराचा आनंद साजरा करणाऱ्या समाजमाध्यमी फुकट्या फॉरवडीर्यांस कळत नसले तरी सरकारला कळते. म्हणूनच खासगी क्षेत्रास आता तरी पुढे या असे आवाहन वारंवार होते. हे वाचल्यानंतरचा पुढील प्रश्न : इतके चांगले सुरू आहे तरी खासगी क्षेत्र निष्क्रिय का? मागणी, उपभोग (कंझम्प्शन) हे त्याचे उत्तर. अर्थव्यवस्था वाढीचे दावे केले जात असताना नागरिकांच्या उपभोग क्षमतेत वाढ व्हायला हवी. मुदपाकखान्यातून एकापाठोपाठ एक सुग्रास पदार्थ बाहेर येत आहेत, पण कोणी सेवनाला तयार नाही या अवस्थेत आनंद किती? याच प्रश्नांची चर्चा खासगी क्षेत्रांत, अर्थातच दबक्या सुरात, सुरू असून ताजी आकडेवारी त्यात अधिकच भर घालते. वाढ आनंददायक खरीच, पण ती उपभोगशून्य असेल तर आनंद साजरा करताना सावधगिरी बाळगणे शहाणपणाचे असते, इतकेच.

मुंबई, गोव्याच्या किनारी भागांवर असेल ड्रोनची नजर

टेहळणी यंत्रणा बसवण्याच्या योजनेवर काम सुरू

मुंबई : अलीकडेच तीन कुवेती नागरिक 'गेटवे ऑफ इंडिया'वर पोहोचल्याची घटना लक्षात घेऊन आता सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली आहे. सागरी सुरक्षा मजबूत करण्याच्या दृष्टीने मुंबई आणि गोव्याच्या किनारी भागांत ड्रोन टेहळणी यंत्रणा बसवण्याच्या योजनेवर सुरक्षा यंत्रणा काम करत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी रविवारी दिली. ही घटना सध्याच्या किनारी सुरक्षा व्यवस्थेतील कमकुवतपणा अधोरेखित करते, असे या अधिकाऱ्यांनी सांगितले.

नित्सो डिट्टो (३१), विजय विनय अँथनी (२९) आणि जे. एस. अनीश (२९) या तिघांनी त्यांच्या मालकाने गैरवर्तन केल्याचा आरोप करत बोटीतून भारतीय हद्दीत प्रवेश केला होता. या तिघांनी अधिकाऱ्यांसमोर आत्मसमर्पण केल्यानंतर त्यांना पासपोर्ट (भारतात प्रवेश करण्यासंदर्भात) नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल अटक करण्यात आली.

हे लोक स्थानिक लोकसंख्येमध्ये सहज मिसळू शकतात, अशी चिंता व्यक्त करताना अधिकाऱ्यांनी तिघांच्या जीपीएसच्या फॉरेन्सिक विश्लेषणात अनेक त्रुटी आढळल्या. या तिघांनीही बॅटरी वाचवण्यासाठी जीपीएस बंद केल्याचा दावा केला. देशविरोधी घटकांकडून त्यांचा गैरवापर केला जाऊ शकतो आणि देशाच्या सागरी सीमांवर पाळत ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर ड्रोनचा वापर करणे आवश्यक असल्याचे सांगितले. मुंबईत २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख करून अधिकाऱ्यांनी किनारपट्टीवर पाळत ठेवण्याच्या उपाययोजना वाढवण्याची गरज अधोरेखित केली. सागरी सतर्कता वाढवण्याची गरज ओळखून महाराष्ट्राच्या ६५२.६ किमी लांबीच्या किनारपट्टीवर आणि गोव्याच्या १०१.० किमी लांबीच्या किनारपट्टीवर पाळत ठेवण्यासाठी लांब पल्ल्याच्या ड्रोनची तैनाती करणे आवश्यक आहे, असा सुरक्षा यंत्रणांचा विश्वास आहे.

गैरहजर राहिल्याने ४० कर्मचाऱ्यांना नोटिसा

'शासन आपल्या दारी' कार्यक्रमातील प्रकार, पालिका आयुक्तांचा निर्णय

भिवंडी : भिवंडी महानगरपालिकेच्या ढिसाळ कारभाराची उदाहरणे समोर येत असतानाच शासन निर्देशानुसार, महापालिकेने शहरात राबवलेल्या 'शासन आपल्या दारी'कार्यक्रमासाठी ४० कर्मचारी अनुपस्थित राहिल्याचे आयुक्त प्रशासनाच्या निदर्शनास आले. त्या कर्मचाऱ्यांना आयुक्त अजय वैद्य यांनी नोटीस बजावल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. महापालिकेत नियमित कामांचा निपटारा होत नसल्याने शहरातील नागरिकांची प्रकरणे अधिकाऱ्यांच्या टेबलावर धूळ खात पडली आहेत. वारंवार हेलपाटे घालून अधिकारी कामे करीत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्यामुळे नुकत्याच एका नागरिकाने आत्मदहनाचा प्रयत्न केल्याचा प्रकार घडला. आयुक्त व अतिरिक्त आयुक्तांचा पालिकेच्या कर्मचाऱ्यांवर वचक नसल्याचे चित्र दिसून येत आहे. काही कर्मचारी वेळेवर कार्यालयात हजर नसतात, तर कार्यालयात हजर असलेले कर्मचारी साईट व मीटिंगमध्ये व्यस्त असतात. त्यामुळे तक्रारदारांना वेळेवर अधिकारी कार्यालयात उपलब्ध होत नाही. राज्य शासनाने दिलेल्या निर्देशानुसार, शासन आपल्या दारी हा उपक्रम महानगरपालिका क्षेत्रात राबवण्यात आले. तेथेही ४० कर्मचारी गैरहजर असल्याचे खुद्द आयुक्त अजय वैद्य यांना दिसून आले. शहरात विविध प्रभाग समिती कार्यक्षेत्रात आयोजित केलेल्या शासन आपल्या दारी या कार्यक्रमांतर्गत कर्तव्यावर गैरहजर राहिल्याबद्दल आयुक्त अजय वैद्य यांनी पालिकेच्या ४० कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली असून, ४८ तासांत उत्तर देण्याचे आदेश दिले आहेत. पालिका प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, शासन आपल्या दारी या कार्यक्रमांतर्गत महापालिकेचे कर्मचारी ठिकठिकाणी नियुक्त करण्यात आले होते. त्यावेळी अनेक विभागांत कार्यरत असलेल्या पालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या गैरहजर असल्याचे आयुक्तांना आढळले. त्यामुळे त्यांनी शिस्तीचा बडगा उगारला आहे. समाधानकारक खुलासा न केल्यास कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे काही कर्मचाऱ्यांमध्ये घबराट निर्माण झाली आहे.

Man assaults cop during an inquiry into suspicious activity

Navi Mumbai : An unidentified guy is facing charges for reportedly punching a police inspector while being questioned about his suspicious behaviour at a bank in Navi Mumbai, officials said on Monday. The incident--wherein a man assaulted a cop--happened about 3:30 am on Sunday in the Koparkhairne neighbourhood, when a police unit on night patrol saw the guy acting suspiciously near a motorbike parked near a bank, reported PTI. The news agency, in its report, stated that when the inspector approached him to question over his conduct, the man allegedly produced a sickle from his

backpack, leading the cops to intervene. During the confrontation, the accused attacked an inspector, causing minor wounds, and then left the area under the cover of night, the report added.

As per the report, a First Information Report (FIR) has been filed against the assailant under sections 353 (attack on a public worker in the course of duty) and 332 (voluntarily causing harm to a public official) of the Indian Penal Code, as well as applicable provisions of the Arms Act.As authorities continue to investigate the incident, cops have launched a manhunt to arrest the man who assaulted the police inspector. Meanwhile, in another incident from Thane district, two men were arrested for possession of ganja (cannabis). According to the PTI report, the two men arrested by the police in Thane district are Odisha's natives and they possessed 37.39 kg of cannabis valued at Rs 16.68 lakh.The officials from the crime branch had received a tip-off about the accused persons. Based on that, they set up a trap near a roadside eatery along the Anjurphata-Vasai road in the Bhiwandi area on the evening of March 1. When the police apprehended the two suspects at the scene, they searched them and found the contraband they were carrying. Then, the people, who were identified as Sagar Surendra Nayak (29), and Rajkishore Dhootkrishna Behra (31) were placed under arrest, the report added. According to the official announcement from the Bhoiwada police station, both people have been booked under the provisions of the Narcotic Drugs and Psychotropic Substances (NDPS) Act, it further stated.

Mass drive in Mumbai as govt vows to vaccinate 1 crore kids over next 5 days

Mumbai: On the occasion of Polio Day, thousands of children between the ages of 0 to 5 were vaccinated in the city. Meanwhile, the state has committed to providing polio vaccination to 1 crore infants over the next five days.Sunita Sutar, a community health worker based in Bandra (West), mentioned that polio vaccination drives are probably the only times when health workers like herself do not have to convince people much. "This is one thing which anyone, anywhere, is aware of," she said.The purpose of continuing these activities for the next five days, according to Sutar, is to reach the unreached population. "Sometimes parents also say their child already has



a fever, so we visit them again after a couple of days for the vaccination," she said.At her booth alone, about 75 infants were vaccinated. There were approximately 104 such booths set up all across H ward, under which Sutar's area falls. Dr Nitin Palve, the ward's medical officer of health, stated that over the next five days, officials aim to provide polio doses to 15,000 children.In comparison, the M-East ward has the monumental task of vaccinating 82,000 children, according to its medical health officer, Dr Sanjay Funde. Dr Nitin Ambadekar, the additional director of health services for the state health department, also visited a few vaccination booths in this ward at the start of the day. "We will be vaccinating about 50,000 children today alone," Dr Funde said.There are approximately 358 booths set up in M-East. "We have also deployed a sizable workforce of 700 to 800 people to administer doses to as many children as possible in our ward," he said.

Bull shark not on govt wildlife list; no relief for Palghar fisherman who lost leg

Mumbai: A few weeks after the quiet hamlet of Dongarpada in Palghar district was rocked by a terrifying bull shark attack, Hitesh Govari, a 34-year-old villager who lost his left leg in the close encounter, opened up to mid-day about his traumatic experience and struggle to receive compensation. Sitting in his modest home, Govari, the sole breadwinner of his family, expressed deep concern about the future of his children, due to his incapacity to continue working as a loader and fisherman. Adding to his plight is the cruel reality that, despite his severe injuries, Maharashtra compensation laws do not cover incidents involving bull sharks.

चुन्याची डबी गिळल्याने बालकाचा मृत्यू

■ **नवीन पनवेल** : चुन्याची डबी तोंडातून गिळल्याने आठ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना पनवेल शहरात घडली आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. २९ फेब्रुवारी रोजी शिव अर्जुन शिंदे (राहणार मालधक्का, पनवेल रेल्वे स्टेशन जवळ, पनवेल) याने तंबाखूच्या सोबत असलेल्या चुन्याची डबी गिळली. त्यामुळे त्याला श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. त्याला एमजीएम रुग्णालय, कामोठे येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले. या घटनेचा तपास पनवेल शहर पोलीस करत आहेत.

अज्ञात मृतदेहाचा पोलिसांकडून तपास सुरू

■ **कसारा** : येथील पोलीस ठाणे हद्दीत मागील पंधरवड्यापूर्वी एका पुरुष जातीचा मृतदेह आढळला होता. त्या मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत. परंतु मृतदेहाजवळ कुठलाही परिचित पुरावा मिळून न आल्याने पोलिसांना मृतदेहाच्या वारसांपर्यंत पोहचण्यास अडचणी येत आहेत. शहापूर तालुक्यातील कसारा गाव हद्दीतील मुंबई-नाशिक महामार्गालगत बंधारा पुलाखालच्या स्मशानभूमीच्या बाजूला अर्थात घाटला नदी काठावर अंदाजे ४५ ते ५० वर्षीय पुरुष व्यक्तीचा मृतदेह कसारा पोलिसांना दिसला. मद्यपान किंवा कुठल्या तरी विकाराने सदर व्यक्तीचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केला आहे. अर्धवट टक्कल, ५.५ फूट उंची, रंगाने काळा-सावळा अशा वर्णनाची मृत व्यक्ती असून, याबाबत कुणाला काही माहीत असल्यास त्यांनी संपर्क साधावा, असे आवाहन कसारा पोलिसांनी केले आहे.

कारची काच फोडून अडीच लाख लांबवले

■ **नवीन पनवेल** : गाडीतील बॅग आणि बॅगेतील अडीच लाख रुपये चोरल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. परेश रामजी शहा हे नेरूळ येथे राहत असून त्यांचा होलसेल टाईल्स सप्लायरचा व्यवसाय आहे. २९ फेब्रुवारी रोजी त्यांनी अडीच लाख रुपये बॅगेत ठेवले होते. ते ओरियन मॉल पनवेल येथे काम असल्याने त्यांनी पैसे त्यांच्या कारमध्ये मागील सीटवर ठेवली आणि कार वडाळा तलावाकडून नाडकर्णी हॉस्पिटल कडे जाणाऱ्या रस्त्यावर निर्माणधीन इमारतीच्या बाजूच्या रस्त्यावर पार्क केली. काम संपवून ते कारकडे गेले असता पाठीमागील काच तुटलेली दिसली. त्यावेळी त्यांना बॅग दिसली नाही व बॅगेतील रक्कम देखील चोरट्याने चोरून नेल्याचे त्यांना आढळले.

वाहनातून लोखंडी पाइप रस्त्यावर पडल्याने गुन्हा दाखल

■ **पनवेल** : भरधाव वेगाने वाहन चालवून वाहनातून लोखंडी पाइप रस्त्यावर पडले आणि त्यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला. म्हणून पनवेल तालुका पोलीस ठाण्यात रामभवन दाल सिंगर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. अंकुश राम पाटील हे वलप येथे राहत असून १ मार्च रोजी रात्री साडेनऊच्या सुमारा असता वलप ते तळोजा एमआयडीसी असे स्कुटी ने जात होते. वलपगाव गावदेवी चायनीज जवळ आले असता ट्रक भरधाव वेगाने तळोजा एमआयडीसीकडे जात होता. यावेळी गाडीतील दीडशे ते २०० दीड इंच लोखंडी पाइप वाहनातून खाली पडू लागले ते अंगावर येतील या भीतीने वाहनाचा वेग कमी केला आणि रस्त्याच्या बाजूला थांबले.

फ्लॅट विक्रीच्या बहाण्याने पोलिसालाच गंडा

खारघर पोलिसांनी पिता-पुत्रावर दाखल केला गुन्हा

या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आलेल्या तुकाराम मुळे व गौरव मुळे या पिता-पुत्रांनी एकच फ्लॅट अनेकांना विकून फसवणूक केली आहे. त्यापैकी पंकज दाते व प्रकाश शिंदे यांनी खारघर पोलीस ठाण्यात या पिता-पुत्राविरोधात फसवणुकीसह अपहार केल्याप्रकरणी दोन गुन्हे दाखल केले आहेत. तसेच या पिता-पुत्रानी अमोल सातपुते व प्रवीण पाटील यांची देखील फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे.

■ **नवी मुंबई** : खारघरमध्ये राहणाऱ्या एका पिता-पुत्राने फ्लॅट विकत देण्याच्या बहाण्याने मुंबई पोलीस दलातील एका पोलीस निरीक्षकाची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. तुकाराम मुळे व गौरव मुळे अशी या पिता-पुत्राची नावे असून, या दोघांनी अशाच पद्धतीने अनेकांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. खारघर पोलिसांनी या पिता-पुत्राविरोधात फसवणुकीसह अपहाराचा गुन्हा दाखल करून या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे. या प्रकरणात फसवणूक झालेले पोलीस निरीक्षक मुंबई पोलीस दलात गुन्हे अन्वेषण विभागात कार्यरत आहेत. २०१६ मध्ये त्यांना नवीन घर विकत घ्यायचे होते. त्या वेळी तुकाराम गंगाराम मुळे व त्यांचा मुलगा गौरव मुळे हे दोघेही पनवेलच्या करंजाडे सेक्टर-६ भागात सनदीप कॉर्नर नावाने इमारतीचे बांधकाम करत असल्याची माहिती या पोलीस निरीक्षकाला मिळाली होती. त्या वेळी त्यांनी तुकाराम मुळे यांच्या खारघर येथील आदित्य एंटरप्रायजेसच्या कार्यालयात त्यांची भेट घेतली. त्या वेळी मुळे पिता-पुत्रानी साडेबारा टक्के योजनेतील प्लॉटवर इमारतीचे बांधकाम करत असल्याचे सांगितले होते. तसेच त्यासाठी लागणाऱ्या सर्व परवानग्या घेण्यात आल्याचे तसेच दीड वर्षामध्ये ऑगस्ट २०१८ पर्यंत फ्लॅटचा ताबा देणार असल्याचे या निरीक्षकाला सांगितले होते. त्या वेळी मुळे यांनी सनदीप कॉर्नर प्रोजेक्टसंदर्भात सिडकोकडून मिळालेल्या परवानग्यासुद्धा त्यांना दाखवल्या होत्या. त्यामुळे पोलीस निरीक्षकाने त्यांच्या प्रोजेक्टमधील फ्लॅट विकत घेण्याची तयारी दर्शवल्यानंतर २३ लाख रुपयांमध्ये फ्लॅटच्या खरेदी विक्रीचा त्यांच्यात व्यवहार ठरला. त्यानंतर पोलीस निरीक्षकाने तुकाराम मुळे यांना १ लाख रुपयांची रक्कम देऊन १०३ क्रमांकाच्या फ्लॅटची बुकिंग केली. त्यानंतर या पोलीस निरीक्षकाने मुळे पिता-पुत्राला आणखी ८ लाख रुपये चेकद्वारे दिले आणि फ्लॅट त्यांच्या नावाने रजिस्ट्रेशन करून देण्यास सांगितले. मात्र, मुळे पिता-पुत्रांनी वेगवेगळी कारणे सांगून रजिस्ट्रेशन करून देण्यास टाळाटाळ केली. त्यानंतर गौरव मुळे याने २०२१ आणि २०२२ मध्ये पोलीस निरीक्षकाकडून रजिस्ट्रेशन करण्याच्या बहाण्याने पोलीस निरीक्षकाकडून कागदपत्रे मागून घेतली.

मात्र, त्यानंतरदेखील त्याने रजिस्ट्रेशन करून दिले नाही. त्यामुळे पोलीस निरीक्षकाने मुळे पिता-पुत्र उभारत असलेल्या प्रोजेक्टसंदर्भात सिडको, तसेच इतर गुंतवणूकदारांकडून माहिती घेतली असता, मुळे पिता-पुत्राने जो १०३ क्रमांकाचा फ्लॅट त्यांना देण्याचे आश्वासन दिले होते, तो फ्लॅट जमीन मालकाला देण्यात येणार असल्याची माहिती करारनाम्यात नमूद असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यामुळे हा फ्लॅट विकण्याचा अधिकार मुळे पिता-पुत्राना नसताना त्यांनी सदर फ्लॅट विकत देण्याचे आश्वासन देऊन फसवणूक केल्याचे लक्षात आले. त्यानंतर या पोलीस निरीक्षकाने खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

कामाच्या ठिकाणी जाऊन पत्नीला तलाक

■ पतीविरोधात ट्रिपल तलाक कायद्यानुसार गुन्हा

■ **नवी मुंबई** : तळोजा भागात राहणाऱ्या एका व्यक्तीने काझी व दोन इस्लामी वकिलासोबत त्याची पत्नी कामाला असलेल्या खारघरमधील कॉलेजच्या कॅन्टीनमध्ये जाऊन तिला तीनवेळा बोलून तलाक दिल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकारणात खारघर पोलिसांनी तलाक दिलेल्या महिलेच्या तक्रारीवरून तिच्या पतीविरोधात मुस्लिम महिला (विवाहाच्या अधिकाराचे संरक्षण) कायद्या २०१९ नुसार गुन्हा दाखल करून या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे. या प्रकरणातील तक्रारदार महिला तळोजा येथे राहण्यास असून, ती खारघरमधील एका इंजीनियरिंग कॉलेजमध्ये क्लार्क म्हणून कामाला आहे, तर तिचा पती अल्ताफ मुबारक अत्तार (४३) हा चालक म्हणून कामाला असून त्याचे दुसऱ्या महिलेसोबत विवाहबाह्य संबंध होते. याबाबतची माहिती त्याच्या पत्नीला समजल्याने तिने त्याबाबत अल्ताफकडे विचारणा केली होती. त्यामुळे अल्ताफने पत्नीला मारहाण करण्यास सुरुवात केली होती. तसेच तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला शारीरिक व मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली होती. पतीकडून होत असलेल्या या छळाला कंटाळून अल्ताफच्या पत्नीने त्याच्या विरोधात सीबीडी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली होती. त्यानंतर या दोघांची पोलिसांच्या महिला सहाय्यता कक्षाकडून समुपदेशन सुरू होते. याचदरम्यान, गत २० डिसेंबर २०२३ रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास अल्ताफची पत्नी आपल्या कॉलेजमधील कॅन्टीनध्ये इतर मैत्रिणींसह चहा पिण्यासाठी गेली होती. त्या वेळी अलताफ हा आपल्यासोबत एक काझी, दोन इस्लामी वकील व सोबत साक्षीदार घेऊन कॉलेजच्या कॅन्टीनमध्ये जाऊन आपल्या पत्नीला तीनवेळा तलाक बोलून त्या ठिकाणावरून निघून गेला.

वीज वितरण व्यवस्थेसाठी ३१ लाखांचा निधी

कसारा गाव वस्त्यांत नवीन विद्युत तारा व खांबांची उभारणी

■ **कसारा** : ग्रामीण भागातील वीज वितरण व्यवस्थेतील पायाभूत भक्कम करण्यासाठी केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी कसारा गावासाठी ३१ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. या महत्त्वपूर्ण निर्णयाने मोखावणे-कसारा ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील जीर्ण विद्युत तारा, गंजलेले विद्युत खांब बदलण्यात येणार असून आडमाळ वस्तीला स्वतंत्र विद्युत रोहित्र देण्यात येणार आहे. मोखावणे-कसारा ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात गेल्या काही वर्षांपासून महावितरण कंपनीच्या व्यवस्थेतील विद्युत तारा, विद्युत खांब जीर्ण आहेत. याकडे दुर्लक्ष झाल्यास एखाद्या वादळवाऱ्यात जीर्ण झालेल्या तारा व गांजलेले खांब कोसळून दुर्घटना घडण्याची दाट शक्यता आहे. ही बाब वारंवार महावितरण कंपनीच्या निदर्शनास आणून देत असताना निधीची कमतरता असल्याचे अभियंत्यांकडून सांगितले जात होते. परंतु वीज वितरण कंपनीच्या व्यवस्थेत सुधारणा व्हावी,या हेतूने भाजपचे कसारा शहराध्यक्ष विनायक सावंत,सरपंच प्रकाश वीर आणि उपसरपंच शरद वेखंडे यांनी केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील यांची भेट घेऊन महावितरण कंपनीच्या पायाभूत सुविधांच्या बळकटी करणासाठी निधीच्या मागणीबाबत निवेदन दिले होते. त्यानुसार ठाणे जिल्हा नियोजन समितीतून कपिल पाटील यांनी मोखावणे-कसारा ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील वस्त्यांना ३१ लाख रुपयांच्या निधीची तरतूद करून दिली. या निधीतून जीर्ण झालेल्या तारा व गंजलेले खांब काढून त्याजागी नवीन तारा व खांब बदलण्यात येतील. यातून मुंबई-नाशिक महामार्गावर असलेल्या आडमाळ वस्तीसाठी स्वतंत्र विद्युत रोहित्र बसविण्यात येणार असल्याचे केंद्रीयमंत्री कपिल पाटील यांचे निकटवर्तीय भाजप शहराध्यक्ष

विनापरवाना शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात पोलिसांची कारवाई

विनोद घोसाळकर हत्येनंतर मुंबई पोलीस सतर्क

■ **मुंबई** : उल्हासनगरमधील गणपत गायकवाड यांच्यावरील गोळीबार, त्यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे माजी आमदार विनोद घोसाळकर यांचे पुत्र अभिषेक घोसाळकर यांची दहिसर येथे गोळ्या झाडून केलेली हत्या या प्रकरणानंतर मुंबई पोलीस सतर्क झाली आहे. राज्यात कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची बाब लक्षात घेऊन मुंबई पोलिसांनी शस्त्र परवान्यांची पडताळणी करण्यास सुरुवात केली आहे. बोगस शस्त्र परवाने बाळगणाऱ्या प्रत्येकावर कारवाई करण्यात यावी, असेही आदेश वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून देण्यात आले आहेत. अभिषेक घोसाळकर यांच्या हत्येनंतर, मुंबई पोलिसांनी सर्व युनिट्सना वैयक्तिक सुरक्षेसाठी शस्त्रे बाळगणाऱ्या आणि सुरक्षा सेवा पुरवण्यात गुंतलेल्या लोकांच्या परवान्याची पडताळणी करण्याचे आदेश दिल्याची माहिती एका अधिकाऱ्याने रविवारी दिली. विनापरवाना शस्त्रे बाळगण्याविरुद्धच्या कारवाईचा एक भाग म्हणून गुन्हे शाखेच्या युनिट ६ आणि ७ यांनी गेल्या १० दिवसांत तीन जणांना अटक केल्याचे या अधिकाऱ्याने माहिती देताना सांगितले.

बिल्डर, राजकारणी आदींच्या संरक्षणासाठी नियुक्त केलेले सुरक्षा रक्षक आणि वैयक्तिक अंगरक्षक यांचा तपासामध्ये समावेश आहे आणि त्यांच्या शस्त्र परवान्यांची पडताळणी केली जात असल्याचे सह पोलीस आयुक्त (गुन्हे) लखमी गौतम यांनी सांगितले. ज्या लोकांकडे इतर राज्यांचे परवाने आहेत आणि मुंबईत त्यांची शस्त्रे वापरतात त्यांनी त्यांचे परवाने हस्तांतरित करून त्यांच्या बंदुकांशी संबंधित कागदपत्रे शहर पोलिसांकडे जमा करण्यासाठी सांगण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. शस्त्रधारी व्यक्तीने पुरेसा तपशील किंवा त्यासंबंधीची कागदपत्रे न दिल्यास त्याच्यावर शस्त्रास्त्र कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला जाईल, असेही ते म्हणाले.

नुकत्याच झालेल्या कारवाईत, गुन्हे शाखेच्या युनिट ७ ने जमरूल हनीफ खान (२६) आणि मोहम्मद यासर मोहम्मद इक्बाल (३४) यांना २१ फेब्रुवारी रोजी घाटकोपर येथून अटक केली, कारण त्यांच्याकडे बंदुक आढळून आली होती. त्यांच्या सुरक्षेसाठी पूंछ, जम्मू आणि काश्मीरच्या अतिरिक्त जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी परवाना दिला होता. पण या दोघांनी महाराष्ट्र पोलिसांकडे आपली शस्त्रे नोंदवली नाहीत. त्यांच्याविरुद्ध शस्त्रास्त्र कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

मालाची चोरी करून विकल्याप्रकरणी गुन्हा दाखल

■ **नवीन पनवेल** : कस्टम विभागाकडून कस्टमर ड्युटी भरणा न केलेल्या मालाची वेअर हाऊस मधून चोरी करून विकल्या प्रकरणी चौघाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अब्दुल नाटेकर यांचा रोहिंजण कंटेनर यार्ड या नावाने वेअर हाऊस आहे. बाहेर देशातून आलेला मालाची कस्टम ड्युटी भरणे बाकी आहे, असा माल गोडाऊन मध्ये साठवून ठेवत असतात. कस्टमकडून क्लिअर झाल्यानंतर हा माल पुढे पाठवतात. त्यांच्याकडे मयुरेश रोहिदास चासकर, सुशील कुमार मंडल, इस्लाम मुस्लिम हे तिघेजण काम करतात. जुलै २०२२ ते २०२३ पर्यंत कस्टम ड्युटी भरण्याने केलेला माल त्यांच्या वेअर हाऊस मध्ये साठवणूक करून ठेवलेला होता. २०२३ मध्ये कस्टमच्या अधिकारी त्यांच्या कंटेनर यार्ड मध्ये आले यावेळी वेअर हाऊस मध्ये ठेवलेला माल चोरी करून विक्री केला जात असल्याचे त्यांना समजले. त्यांनी वेअरहाऊस मधील बॉक्स करून पाहिले असता बॉक्स मधील माल गायब होता. एकूण नऊ कोटीचा माल वेअरहाऊस मधून विकला गेला असून त्या ठिकाणी सर्व कचरा भरून ठेवल्याचे कस्टम अधिकाऱ्यांनी कळवले. याबाबत मयुरेश चासकर आणि मंडळ यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी काहीही माहिती नसल्याचे सांगितले. त्यानंतर मयुरेश चासकर यांच्याकडे चौकशी केली असता त्याने कस्टमचा माल सहा महिन्यांपूर्वी शैलेश ठाकूर व सुशील मंडळ व महेश शिवाले यांनी काढून नेला असल्याचे कबूल केले. याप्रकरणी मयुरेश चास्कर, सुशील कुमार मंडल, शैलेश ठाकूर आणि महेश शिवाले यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

पालिकेतील दोन उपशिक्षिकांचे निलंबन

पालिका आयुक्तांचा निर्णय, बनावट स्वाक्षरी करून बँकेतून घेतले कर्ज

◆ शिक्षक महिलांनी शहरातदेखील काही नागरिकांना कर्ज मिळवून देण्याच्या हेतूने फसवणूक केली आहे. त्यापैकी शहरातील इस्लामपूर भागात राहणाऱ्या एका इसमास ५ कोटी कर्ज मिळवून देण्यासाठी अकिला मो हसन मोमीन यांनी ५ लाख रुपये घेतले होते.

◆ ही रक्कम परत मागितली असता, अकिला मोमीन यांनी दिलेला ५ लाखांचा धनादेश बँकेत वटला नाही. त्यामुळे या प्रकरणी भिवंडी न्यायालयात दावा दाखल करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

■ **भिवंडी** : भिवंडी महापालिकेच्या शिक्षण विभाग शाळा क्र. ११ व ८ या शाळांमध्ये मुलांना शिक्षण देणाऱ्या दोन उपशिक्षिकांनी बनावट दाखले तयार करून त्यावर मुख्याध्यापक म्हणून स्वाक्षरी करत त्यांच्या नावे बँकेतून कर्ज मंजूर करून घेतल्याप्रकरणी पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी त्या दोन पालिका उपशिक्षिकांना निलंबित केले आहे. मात्र, त्यांच्यावर अद्याप संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल न झाल्याने शहरात उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. या दोन महिला शिक्षिका बनावट शिक्षकांच्या नावाने कर्ज मिळवून देत असलेल्या रॅकेटचा पर्दाफाश झाला आहे. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर आयुक्तांनी दोन्ही महिला शिक्षकांना तत्काळ निलंबित केले आहे. बनावट शिक्षकांच्या नावाने बोगस कागदपत्रे तयार करून आतापर्यंत डझनभर लोकांची लाखो रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. शिक्षकांच्या या रॅकेटमध्ये शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांसह बँक कर्मचाऱ्यांचाही सहभाग असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. पालिका सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हुमा अहमद नाशिककर या पालिका शाळा क्र. ८ मध्ये उपशिक्षिका, तर अकिला मो हसन या शाळा क्र. ११ मध्ये उपशिक्षिका आहेत. त्यांनी शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत नसलेल्या चार लोकांच्या नावे त्यांची बनावट पगार स्लिप बनवून त्यावर स्वतः मुख्याध्यापकाची सही करून प्रत्येकीने ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून १५ लाख मंजूर करून घेतले. या घटनेची माहिती मिळताच आयुक्त अजय वैद्य यांनी क्रभिनिश महानगरपालिका/प्रशिवी/२७८/ येथे जाऊन आदेश २०२४ आणि ज.क्राभिनीश महानगरपालिका/प्रशिवी/२७९/२०२४ जारी करून दोन्ही उपशिक्षकांना निलंबित केले.

निलंबनाच्या आदेशात आयुक्तांनी म्हटले आहे की, बनावट शिक्षकाच्या नावाने मुख्याध्यापकाची खोटी स्वाक्षरी करून बँकेकडून कर्ज घेणे हा अत्यंत गंभीर गुन्हा आहे. या प्रकरणात दोन्ही शिक्षकांनी आपल्या पदाचा गैरवापर करून जनतेच्या मनात महापालिकेची प्रतिमा डागाळण्याचे काम केले आहे. त्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ च्या नियम चारच्या उपनियम (१) अन्वये अधिकाराचा वापर करून हुमा अहमद नाशिककर आणि अकिला मो हसन मोमीन यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५६ (२) (एफ) अन्वये तत्काळ निलंबित करण्यात आले आहे. मात्र, पदाचा गैरवापर करून बनावट आणि खोटे कागदपत्रे बनवल्या प्रकरणी पालिका प्रशासन कधी फौजदारी कारवाई करणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

रस्त्यांवरील पे अँड पार्कने पालिकेच्या उत्पन्नात भर

मीरा-भाईंदर महापालिकेचा निर्णय, ५ रस्त्यांवर १ मार्चपासून पे अँड पार्किंग

■ **मीरा रोड** : मीरा भाईंदर शहरातील नागरिकांना पुरेशी पार्किंग व्यवस्था नसल्यामुळे महापालिकेने शहरातील रस्त्यांवर पे अँड पार्किंग सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. पहिल्या टप्प्यात १५ ठिकाणी मंजूर केलेल्या पे अँड पार्कपैकी ५ रस्त्यांवर पे अँड पार्क १ मार्चपासून सुरू करण्यात आले आहे. पे अँड पार्किंगमध्ये नागरिकांना शुल्क भरावे लागणार आहे. त्यामुळे रस्त्यावर वाहने उभे करणाऱ्या नागरिकांची वाहने वाहतूक पोलीस वाहन उचलून नेणार नाहीत. शिवाय पालिकेच्या उत्पन्नात भर पडणार आहे.

मीरा-भाईंदर शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. वाहनांची संख्या वाढत असली तरी पुरेशा प्रमाणात पार्किंगची व्यवस्था नव्हती. शहरात भाईंदर पश्चिम, मीरा रोड व कनाकिया या तीन ठिकाणीच पार्किंगची व्यवस्था आहे. इतर ठिकाणी पार्किंगची व्यवस्था नसल्याने वाहनचालक रस्त्यावर वाहने उभी करत होती. जिथे जागा मिळेल तिथे वाहने उभी करत होते. त्यामुळे वाहतूक कोंडी होत होती व त्या वाहनावर वाहतूक पोलिसांकडून कारवाई केली जात होती. तसेच रस्त्यावर अगोदरच फेरीवाले, हातगाडी व या पार्किंग केलेल्या वाहनांमुळे नागरिकांना रस्त्याने चालण्यास अडचण निर्माण होत होती. त्यामुळे पादचारी व वाहन चालकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. काही वर्षांपासून नव्याने पार्किंगची व्यवस्था करण्याची मागणी केली जात होती. जागेअभावी पार्किंग व्यवस्था सुरू करता येत नव्हती. पालिकेने शहरातील रस्त्यांवर पार्किंगची व्यवस्था उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला असून, वाहने उभी करणाऱ्या वाहनचालकांकडून शुल्क आकारून पालिकेचे उत्पन्न वाढवण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात पालिकेने १५ रस्त्यांवर पे अँड पार्क सुरू करण्यास मंजुरी दिली आहे. या १५ वाहनतळांमध्ये २,८८३ चारचाकी तर ५,९४३ दुचाकी वाहने उभी राहण्याची क्षमता आहे. त्यापैकी पाच रस्त्यांवर महापालिकेने १ मार्चपासून पे अँड पार्क सुरू केले आहे. पे अँड पार्किंगचा ठेका नाशिकच्या भालवी ग्रुप या ठेकेदारास दिलेला आहे. मीरा रोडच्या शांती शॉपिंग सेंटर ते अस्मिता गार्डन व भक्ती वेदांतपर्यंतच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला ३८ ठिकाणी शीतल नगर नाका ते मीरा रोड रेल्वे स्थानक व मच्छी मार्केटपर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूने ११ ठिकाणी, मीरा रोड स्थानक ते जॉगर्स पार्क रस्त्याच्या दोन्ही बाजूला ६ ठिकाणी व नयानगर रेल्वे समांतर रस्त्याच्या दोन्ही बाजूला पे अँड पार्क सुरू केले आहे

■ पालिकेने शहरात आणखी ३४ नवीन वाहनतळ प्रस्तावित केले आहे. त्याला वाहतूक पोलिसांकडून मंजुरी मिळाल्यानंतर सुरू होणार असल्याचे समजते. पार्किंग व्यवस्था सुरू केलेल्या ठिकाणी महापालिकेने फलक लावले आहेत. त्या फलकावर रस्त्यावर सुरू केलेल्या पे अँड पार्कचे १८ टक्के जीएसटीसह दर सहा तासांसाठी, १२ तासांसाठी, २४ तासांसाठी आणि मासिक स्वरूपातही वाहनासाठी पास उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

किरकोळ वादातून पत्नीची गळा दाबून हत्या

आरोपी पतीला ६ मार्चपर्यंत पोलीस कोठडी, सततच्या भांडणातून कृत्य

■ **बोईसर** : घरगुती किरकोळ कारणावरून बोईसर दांडीपाडा येथील कृताली पाटील (३२) हिला राहत्या घरी पती कनिष्क पाटील याने गळा दाबून हत्या केली. शनिवारी त्यांच्यात पुन्हा किरकोळ वाद झाला. हा वाद रात्री उशिरापर्यंत सुरू होता. रविवारी स्वतः बोईसर पोलीस ठाण्यात जाऊन बायको सकाळी झोपेतून उठली नाही. ती मरण पावल्याची खबर पतीने दिली. पतीला अटक करून न्यायालयात हजर केला असता, ६ मार्चपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. कृताली कुरिअर कंपनीत कामाला होती. कनिष्क चारचाकी वाहनाचे गॅरेज चालवत होता. डहाणू तालुक्यातील वासगाव येथील असणाऱ्या कृतालीचा कनिष्क पाटील याच्याशी विवाह झाला. बोईसर येथील दांडी पाडा येथे ते राहत होते. यांच्यात वारंवार किरकोळ कारणावरून भांडण होत होते. भांडणामुळे दोघे महिना महिना, तर कधी पाच-सहा महिने बोलणे होत नव्हते. शनिवार, २ मार्चला पुन्हा किरकोळ वाद झाला. हा वाद रात्री उशिरापर्यंत सुरू होता. पती कनिष्क पाटील (३४) याने रागात पत्नी कृताली पाटील (३२) हिच्या तोंडावर उशी दाबून, गळा दाबून हत्या केली. नंतर स्वतः बोईसर पोलीस ठाण्यात जाऊन बायको सकाळी झोपेतून उठली नाही. ती मरण पावल्याची खबर दिली.

या दोघांच्या सततच्या भांडणामुळे कृतालीच्या वडिलांनीही कृतालीला मारले असेल, असे संशय घेत फिर्याद दिली. त्यामुळे पोलिसांनी घटनास्थळी जाऊन चौकशी केली. मृताच्या गळाला लालसर डाग होते. मृतदेह शवविच्छेदनासाठी तारापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठवण्यात आले. डॉक्टरांनी शवविच्छेदन करून मृत्यू गळा दाबून झाल्याचे सांगितले. पोलिसांनी पतीची अधिक चौकशी केली असता, वारंवार किरकोळ कारणामुळे होणाऱ्या भांडणामुळे पत्नीची हत्या केल्याची कबुली त्याने पोलिसांना दिली. त्याला अटक करून न्यायालयात हजर केले असता ६ मार्चपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. किरकोळ वादातून असे प्रसंग होत असल्याने समाजातून चिंता व्यक्त करण्याची परिस्थिती निर्माण होत आहे.